रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २६०

www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, ८ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'डिजिटल शिक्षणाचे धोरण स्वीकारणे काळाची गरज'/२

हेटवणे जलवाहिनीवरील पाणीपुरवठा राहणार बंद/३

'एमसीए'कडून रायगड क्रिकेटसाठी निधी/८

## पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात वाढ



**मुंबई :** केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रत्येकी दोन रुपयांची वाढ केली असून या वाढीचा भार सामान्य माणसालाही सहन करावा लागणार नाही, अशी माहिती सोमवारी (दि.७) पेट्रोलियम मंत्र्यांनी केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी दिली आहे. ते म्हणाले की, केंद्र सरकारने पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १३ रुपये आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपये वाढविले आहे. या वाढीमुळे पेट्रोल व डिझेलच्या किमतीत कोणतीही वाढ होणार नाही. दरम्यान, मुंबईत पेट्रोलचा दर १०३.४४ रुपये आणि डिझेलचा दर ८९.९७ रुपये प्रति लिटर आहे. तर दिल्लीत पेट्रोलची किंमत ९४.७२ रुपये आणि डिझेलची किंमत ८७.६२ रुपये प्रति लिटर आहे.

# सायबर गुन्हे नियंत्रणात महाराष्ट्र अव्वल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र हा सायबर गुन्हेगारी नियंत्रणामध्ये पहिल्या क्रमांकावर असल्याचे सांगून डीजिटल अरेस्टसारख्या प्रकरणांमध्ये चांगले सुशिक्षीत लोकही पैसे देत असल्याचे दिसत आहे. त्यासाठी जनजागृती महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. ७) येथे केले.

मुंबई पोलीस दलाच्या विविध उपक्रमांचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आझाद मैदान पोलीस ठाण्यातील उत्कर्ष सभागृहात झाले. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमास गृहराज्यमंत्री योगेश कदम, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह मुंबई पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायबर गुन्हेगारी रोखणे आणि सायबर गुन्हेगारांना पकडणे हे भविष्यातील सर्वात मोठे आव्हान असणार आहे. हे आव्हान पेलण्यासाठी मुंबई पोलीस दल सज्ज आहे. मुंबईतील सर्वच पोलीस ठाण्यांमध्ये महिला, नागरिक केंद्रित सोयीसुविधांची उभारणी करण्यात आली असून पोलीस ठाणी लोकाभिमुख झाली असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्याची मुंबई पोलिसांची मोठी क्षमता आहे. सायबर गुन्ह्याच्या एक प्रकरणात १२ कोटी रुपये वाचवण्यात मुंबई पोलिसांना यश आले आह. भविष्यातील सायबर गुन्ह्यांचे आव्हान पेलण्यासाठी मुंबई पोलीस दलाने आतापासूनच अनेक उपक्रम हाती घेतले असून सायबर गुन्हे रोखण्यासाठी महत्वाचे असलेल्या अत्याधुनिक तीन सायबर लॅब उभारण्यात आल्या आहेत. या लॅबचे आज लोकार्पण करण्यात येत आहे.




**विविध उपक्रमांना सुरुवात**

मुख्यमंत्री फडणवीस आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत मुंबई पोलीस दलाच्या नवीन मोटरसायकल, इंटरेप्टर व्हेईकल, फॉरेन्सिक लॅब व्हॅन, निर्भया पथकाच्या व्हॅन यांना हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आल्या तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आझाद मैदान येथील उत्कर्ष सभागृह, पार्क साईट पोलीस ठाण्याची नूतन इमारत यांचे लोकार्पण करण्यात आले. मुंबईतील ८७ पोलीस ठाण्यातील महिला व बाल सहाय्यता कक्ष, २१६ पोलीस ठाणे व उपायुक्त कार्यालयांमध्ये उभारण्यात आलेली दूरदृष्य प्रणाली यंत्रणा, पोलीस विभागाची एक्स हॅन्डल, यांचे लोकार्पण, मिशन कर्मयोगी माहिती पुस्तिकेचे अनावरण व मिशनचे कार्यन्वयन, पोलीस प्रशिक्षणाचे कार्यान्वयन करण्यात आले.

## शिवपुण्यतिथीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रायगडावर येणार

### निमंत्रण स्वीकारल्याची रघुजीराजे आंग्रे यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**



श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ आणि स्थानिक उत्सव समिती महाड यांच्या वतीने किल्ले रायगडावर ११ आणि १२ एप्रिल रोजी शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे यांनी सोमवारी (दि.७) पत्रकार परिषदेत दिली.

गेली १२८ वर्ष समितीच्या माध्यमातून किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमासाठी दरवर्षी एका वक्त्याला निमंत्रित केले जाते. या वर्षी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांनी हे निमंत्रण स्वीकारले आहे. त्यांच्यासमवेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हेही १२ एप्रिलला होणाऱ्या शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

या वेळी शिवपुण्यस्मृती पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. दुर्ग अभ्यासक निळकंठ पाटील यांना श्री शिवपुण्यस्मृती पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे, तर या कार्यक्रमात अहिल्याबाई होळकर यांचे वंशज उदयसिंह होळकर आणि निवृत्त लेफ्टनंट जनरल संजय कुलकर्णी यांनाही सन्मानित केले जाणार असल्याची माहिती आंग्रे यांनी या वेळी दिली.

११ एप्रिल रोजी शिवसमाधी आणि जगदीश्वर मंदीर परिसरात दीपवंदना केली जाणार आहे. हरीजागर आणि शिवमहिमा सांगणाऱ्या शाहिरी कार्यक्रम होणार आहेत, तर १२ एप्रिल रोजी पुण्यतिथी अभिवादनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे. शिवभक्तांनी या अभिवादन कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे तसेच सुरक्षेच्या कारणास्तव शिवभक्तांनी येताना आपले ओळखपत्र सोबत ठेवावी, असे आवाहनही संस्थेचे अध्यक्ष आंग्रे यांनी केले आहे.

## गर्भवती मृत्यूप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी

### डॉ. सुश्रुत घैसास यांचा राजीनामा

**पुणे : प्रतिनिधी**

गर्भवती महिला तनिषा भिसे यांच्या मृत्यूप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीत पुण्यातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला गंभीर दोषी ठरवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. सुश्रुत घैसास यांनी रुग्णालय प्रशासनाकडे आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्द केला आहे.

मंगेशकर रुग्णालयाकडून वैद्यकीय सेवा देण्यात झालेल्या हलगर्जीपणामुळे भिसे यांचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. डॉ. घैसास हे या प्रकरणात मुख्य डॉक्टर होते. त्यांनी भिसे यांच्यावर उपचार सुरू करण्याआधी त्यांच्याकडून १० लाख रुपये आगाऊ रक्कम मागितल्याचा आरोप आहे.

चौकशी अहवालानुसार तनिषा भिसे यांना सकाळी ९ वाजता रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यानंतर दुपारपर्यंत म्हणजे २.३० वाजेपर्यंत प्राथमिक उपचारही करण्यात आले नव्हते. यासोबतच ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णाला नेण्यापूर्वी डॉक्टरांनी १० लाख रुपयांची मागणी केली.

या प्रकारामुळे रुग्ण व कुटुंबियांवर मानसिक ताण निर्माण झाला. रुग्णासमोरच ही आर्थिक मागणी झाल्यामुळे रुग्णाची मानसिक स्थिती ढासळल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, हॉस्पिटल प्रशासनाची होणारी बदनामी आणि रुग्णांची होणारी गैरसोय पाहता डॉ. घैसास यांचा राजीनामा घेण्यात आला आहे.

## शहर उपजीविका कृती आराखडा समितीची पनवेलमध्ये बैठक

### उपेक्षितांना लाभ मिळवून द्यावा -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या शहर उपजीविका कृती आराखडा समितीची पहिली बैठक मंगळवारी (दि. ७) महापालिकेच्या समिती हॉलमध्ये झाली. या वेळी बोलताना माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उपेक्षितांसाठी अशा प्रकारच्या योजना प्रभावीपणे राबवून त्याचा लाभ योग्य लाभार्थ्यांना कसा मिळेल याकडे सर्वांनी लक्ष द्यावे, असे सूचित केले.



या बैठकीस अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, डॉ. अरुणकुमार भगत, तळोजा इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर तसेच सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिकेंतर्गत असलेल्या शहर उपजीविका कृती आराखडा समितीचे कामकाज अतिशय उत्तम रितीने होऊन महापालिका क्षेत्रातील उपेक्षितांना योग्य न्याय मिळेल, यासाठी समितीच्या सर्व घटकांनी नियोजनबद्ध कामकाज करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दिले. अ‍ॅड. प्रकाश बिनेदार यांनीही समितीच्या कामकाजाबाबत सुयोग्य सूचना केल्या.

दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या शहर अभियान व्यवस्थापक विनया म्हात्रे यांनी संपूर्ण समितीचे तसेच करावयाच्या कामाचे संगणकीय सादरीकरण केले तसेच त्यांनी समितीच्या रचनेबाबतही सविस्तर माहिती दिली. **(पान २ वर..)**

## निवडक

### अमेरिकेतील आंदोलनामुळे शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या आयात शुल्क धोरणामुळे भारतीय आणि जागतिक बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. ट्रम्प यांच्या व्यापार धोरणामुळे भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात घसरण झाली असून अवघ्या १० सेकंदात गुंतवणूकदारांचे २० लाख कोटी रुपये वाया गेले आहेत. भारतीय शेअर बाजार १० महिन्यांच्या नीचांकी स्तरावर पोहचला आहे.

### सौदीमध्ये भारतासह १४ देशांना व्हिसा बंदी


**सौदी :** सौदी अरेबियाने भारत आणि पाकिस्तानसह १४ देशांच्या तात्पुरत्या व्हिसावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये उमरा, व्यवसाय आणि कुटुंब व्हिसावर बंदी घालण्यात आली आहे. हज यात्रेशी संबंधित गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि योग्य नोंदणी केल्याशिवाय देशात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना रोखण्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सौदी अरेबियामधील अधिकाऱ्यांनी सांगितले.

## राज्यात तापमानाचा उद्रेक!

### उष्णतेच्या लाटा सुरूच राहणार असल्याचा अंदाज

**पुणे : प्रतिनिधी**

नागपूर : एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा उजाडताच राज्यातील तापमानाचा पारा देखील उंचावला आहे. राज्यातील उन्हाची दाहकता वाढतच असून सोमवारी अकोला येथे राज्यातील सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे करण्यात आली. उन्हाळ्यातील या हंगामातील हे सर्वाधिक तापमान आहे.



राज्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आणि वाढत्या तापमानाला थोडा 'ब्रेक' लागला. त्याआधीदेखील राज्यातील तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. आता अवकाळी पावसाने उसंत घेताच वातावरण थंड होण्याऐवजी तापमानात झपाट्याने वाढ झाली. एप्रिल महिना जसजसा समोर सरकत आहे, तसतशी तापमानात झपाट्याने वाढ होत आहे.

उन्हाळ्यात सर्वाधिक तापमानाची नोंद दरवर्षीच विदर्भात होते. आताही उष्णतेचा कहर वाढत चालला आहे. हवामान खात्याने 'येलो अलर्ट' जाहीर केला आहे. तर पुढील काही दिवसात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचण्याची शक्यताही वर्तवली आहे. गुजरात आणि वायव्य भारतातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे विदर्भातील तापमान झपाट्याने वाढत आहे.

**कोणत्या भागात किती तापमान?**

विदर्भ उत्तर महाराष्ट्र प्रचंड तापले असून अकोला ४४.२ अमरावती ४२.६ यवतमाळ ४२.४ वर्धा ४१.१ नागपूर ४२.२ चंद्रपूर ४२.६ गोंदिया ४०.४ गडचिरोली ४०.६ अंश सेल्सिअस अशा नोंदी झाल्या आहेत. जळगाव आणि नंदुरबार या दोन जिल्ह्यात ४२.८ अंश सेल्सिअसची नोंद झाली. मराठवाड्यात सर्वाधिक तापमान परभणीत नोंदवले गेले. ४०.७ अंश तापमानाची नोंद परभणीत झाली आहे. छत्रपती संभाजी नगर ४०.२ अंशावर, तर लातूर धाराशिवमध्ये ३९.२ अंश सेल्सिअस तापमान होते.



**खारघर : सेक्टर १५ येथे श्रीरामनवमीनिमित्त सायंकाळी गणेश तलावाजवळ गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून प्रतिकात्मक गंगा आरती केली व प्रभू श्री रामांचे दर्शन घेतले तसेच सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.**

## रुग्णालयातून उपचाराविना घरी पाठवलेल्या मुलाचा मृत्यू



**माणगाव, म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्याच्या घुम गावातील एका मुलाचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या मुलाला माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी उपचाराविना घरी पाठविल्याने तेच त्याच्या मृत्यूस जबाबदार असल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे.

गर्वांग दिनेश गायकर (वय १४) या मुलाच्या पायावर केसपुळी आल्याने त्याला शुक्रवारी म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले होते. नंतर ताप आल्याने शनिवारी रात्री माणगाव उपजिल्हा रुग्णालयात नेले, मात्र त्याच्यावर उपचार न करता त्याला परत घरी पाठवण्यात आले. दुसऱ्या दिवशी गर्वांगचा मृत्यू झाला.

**माणगाव उपजिल्हा रुग्णालयात रुग्ण दाखल झाल्यानंतर त्याला तपासले असता अ‍ॅडमिट करण्याची आवश्यकता वाटली नाही असे तपासणाऱ्या डॉक्टरांचे म्हणणे आहे. कोणतीही रक्त तपासणी न करता तापाच्या गोळ्या देऊन रुग्णाला घरी पाठवण्यात आले. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे सादर केला जाईल.**

**-डॉ. किरण शिंदे, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड-अलिबाग**

**डॉ. सावंत व डॉ. राप्ते त्या वेळेस ड्युटीवर होते. त्यांनी रुग्णाला तपासल्यानंतर तो व्यवस्थित असल्याने घरी पाठवले. वरिष्ठांकडून या संदर्भात कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून मुलाला व त्याच्या आई-वडिलांना शंभर टक्के न्याय मिळेल.**

**-डॉ. महेश मेहता, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, माणगाव**

## हापूस आंब्याची आवक वाढली; दरही झाले कमी!

### तब्बल एक लाख पेट्या नवी मुंबई एपीएमसीत दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये हापूस आंब्यांच्या पेट्यांची बम्पर आवक झाली आहे. सोमवारी (दि.७) एक लाख हापूस आंब्यांच्या पेट्या एपीएमसीत दाखल झाल्याने दर कमी झाले आहेत. ८० हजार हापूस आंब्याच्या पेट्या कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधूदूर्ग जिल्ह्यातून आल्या आहेत, तर उर्वरित २० हजार पेट्या परराज्यातून आल्या आहेत. यामध्ये कर्नाटक, केरळ राज्यांचा समावेश आहे.

कर्नाटकचा हापूस ६० ते १२० रुपये किलोने विकला जात आहे. कोकणातील हापूस आंब्याला १५०० ते ३५०० रुपयांचा दर हा चार डझनाच्या पेटीला मिळत आहे. मे महिन्याच्या १० तारखेपर्यंत हापूस आंब्याचा सिझन चांगला असल्याने खवय्यांनी याच काळात आंबा खरेदी करावे असे आवाहन व्यापारीवर्गाने केले आहे. हापूस आंब्याबरोबर तोतापुरी, बदामी या जातीचे आंबेसुद्धा बाजारात येऊ लागले आहेत.



कोकणातील हापूस हा आपल्या वेगळ्या चवीसाठी जगभर प्रसिद्ध असून त्याला जगभरातून मोठी मागणी आहे. फळ बाजारात हापूसची आवक वाढत असून परदेशातूनदेखील हापूसची मागणी वाढत आहे. त्यामुळे याचा फायदा कोकणातील आंबा बागायतदारांना होणार आहे. कोकणात खास करुन रत्नागिरी, देवगड आणि रायगड जिल्ह्यातील हापूस हा जगप्रसिद्ध आहे. कोकणात अडीच लाख मेट्रीक टन उत्पादनापैकी २५ हजार मेट्रीक टन फळाची, तर १० हजार मेट्रीक टन मँगो पल्पची निर्यात होते. त्यामुळे ३४० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते.

**आंबाप्रेमींना पर्वणी**

*चालू एप्रिल महिन्यापासून हापूस आंब्याचा हंगाम मोठ्या प्रमाणात सुरू होतो. सध्या हापूस आंब्याच्या एका पेटीला जवळपास तीन हजार ते चार हजार रुपयांपर्यंतचा बाजार भाव मिळतोय. मे महिन्यात मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात येत असतो, मात्र यंदा १ एप्रिल ते १० मेपर्यंत मोठ्या प्रमाणात हापूस आंबा बाजारात उपलब्ध झाला आहे. त्यामुळे या एप्रिल महिन्यापासून आंबाप्रेमींना आंबा खाण्यासाठी एक पर्वणीच मिळाली आहे तसेच कमी दरात आंब्याचा आस्वाद घेता येणार आहे.*

## विमानात प्रवासी महिलेचा मृत्यू

**मुंबई :** इंडिगो एअरलाईन्सच्या एका फ्लाईटमध्ये एका प्रवासी महिलेचा बसल्या जागी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना घडल्यानंतर या विमानाचे छत्रपती संभाजीनगरमध्ये इमर्जन्सी लँडींग करण्यात आले आहे. यानंतर या महिलेला मृत घोषित करण्यात आले.

मुंबई ते वाराणसी जाणाऱ्या इंडिगोच्या एका विमानात मिर्झापूर येथील सुशीला देवी (वय ८९) प्रवास करत होत्या, मात्र विमान हवेत असतानाच त्यांची तब्येत बिघडली. यानंतर काही वेळाने त्यांचा मृत्यू झाला. यानंतर छत्रपती संभाजीनगर विमानतळावर विमानाचे इमर्जन्सी लँडींग करण्यात आले. नंतर त्या महिलेला मृत घोषित करण्यात आले.

### अभिनंदन अन् शुभेच्छा!



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे (ता.उरण) येथील तु. ह. वाजेकर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे नवीन प्राचार्य बबन साळुंखे यांना संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी संस्थेचे पनवेलचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब कारंडे, कार्यालयीन प्रमुख गुजर, फुंडे हायस्कूलचे चेअरमन कृष्णा कडू, विद्यालयाचे लेखनिक नवनीत ठाकूर, शिक्षक डी.डी. पाटील आदी उपस्थित होते.**

# अपघातांचे प्रमाण वाढले

## उड्डाणपुलावरून दुचाकी कोसळून एक ठार

### तारा गावाच्या हद्दीतील घटना





**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावरील तारा गावच्या हद्दीतील उड्डाणपुलावर एक विचित्र अपघात घडला या अपघातात विरुद्ध दिशेने आलेल्या चारचाकी वाहनाने, समोरून जाणाऱ्या दोन दुचाकी आणि एका रिक्षा ला समोरून जोरात धडक दिली आहे. हा धडक एवढी भयंकर होती की, अपघातग्रस्त दुचाकी चक्क पुलावरून खाली पडली त्या वरील प्रवासी गंभीर जखमी झाली आहे. यातील एक प्रवासी मयत पावला आहे. तर इतर दोघेजण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पनवेल तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील तारा गावाच्या हद्दीत पेणकडून पनवेलच्या दिशेने जात असलेले चार चाकी वाहन (एमएच ०६ बीयू ८११८) अतिवेगात विरुद्ध दिशेने जात असताना, तारा गावाच्या हद्दी जवळ पुलावर पनवेलकडून पेणच्या दिशेने येत असलेल्या दोन मोटरसायकलसह एका रिक्षाला धडक दिली. ही धडक एवढी जोरदार होती की यातील एक मोटरसायकल (एमएच २८ बीसी २६८३) वरील दोन प्रवाशांसह एक चिमुकली पुलावरून सुमारे ३० फूट खाली पडल्याने तिनही मोटर सायकलस्वार गंभीर जखमी झाले आहेत.

दरम्यान, जखमींना पनवेल येथील रुग्णालयात नेण्यात आले आहे. यामध्ये आदिती सिंग (वय २८) हिचा मृत्यू झाला आहे. तर गौरी खैरनार (वय १०), सलमान शहा (वय २७) हे जखमी झाले आहेत. या अपाघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वाहनाच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** तळोजा येथून सायकलवरून नावडे येथे मासे पकडण्यासाठी जाताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. उत्तम किरण मंडळ (वय ५१) असे या अपघातात मृत्यू पावलेल्या सायकलस्वाराचे नाव असून ते तळोजा डोंगऱ्याचा पाडा येथे राहत होते. उत्तम हे शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे मासे पडकडण्यासाठी त्यांच्या सायकलने मुंब्रा-पनवेल मार्गालगतच्या नावडे येथे जात होते. एल ॲण्ड टी कंपनीसमोर आले असताना भरधाव आलेल्या वाहनाने त्यांच्या सायकलला जोराची धडक दिली. या अपघातात ते मयत झाले.

या प्रकरणाची माहिती तळोजा पोलिसांना मिळाल्यावर त्यांनी या अपघाताला कारणीभूत असलेल्या अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## रसायनीत जप्त टँकरचा लिलाव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस स्टेशन जिवनावश्यक कायदा ३,७८ घ्या गुन्ह्यमध्ये मुद्देमाल टँकर ९ ऑगस्ट २०१२ रोजी जप्त करण्यात आला होता. येथील सहा टँकरचा लिलाव १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

टँकर या गुन्हयात जप्त आहेत. हे टँकर बरेच दिवसांपासुन पोलीस ठाणे आवारात पडुन असल्याने ते गंजुन जावून, खराब झाल्याने संबंधीत टँकर यांचे मालकांना नोटीस पाठवेन घेऊन जाणे बाबत कळविण्यात आलेले होते, परंतु त्यांनी ते आजपावेतो घेऊन गेलेले नसल्या कारणाने सदर मुद्देमाल (टँकरचा) लिलाव करून मिळालेले पैसे शासन जमा होण्याकरीता आदेश होणेबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पनवेल यांना विनंती करण्यात आली होती. ही विनंती प्रथमवर्ग न्यादंडाधिकारी पनवेल यांनी मान्य केली असुन सदर मुद्देमालाचा (टँकरचा) जाहीर लिलाव करण्याची परवानगी दिलेली आहे.

हा जाहीर लिलाव १५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता रसायनी पोलीस ठाणे आवारात आयोजित केलेला आहे. उक्त लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविणाऱ्या इच्छुकांनी अनामत रक्कम १,००,००० रुपये (एक लाख मात्र) १४ एप्रिल २०२५ रोजीपर्यंत रसायनी पोलीस ठाणे येथे चेकद्वारे जमा करावी, असे रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## साडेनऊ लाखांचे गहाळ मोबाईल मूळ मालकांच्या स्वाधीन



**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिसांनी आपल्या हद्दीतील चोरीस गेलेल्या व गहाळ झालेल्या नऊ लाख ५१ हजार रुपये किमतींच्या विविध कंपनींच्या ५० मोबाईल फोनचा शोध घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्या हस्ते मूळ मालकांच्या स्वाधीन केले. या वेळी हरवलेले व चोरीला गेलेले आपले मोबाईल फोन परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक करीत त्यांचे आभार मानले.

गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारने सीईआयआर (सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटीटी रजिस्टर) हे पोर्टल कार्यान्वित केले आहे. या पोर्टलचा वापर करून नागरिकांच्या हरवलेल्या मोबाईल फोनचा शोध घेण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक दीपक सुर्वे व निरीक्षक (गुन्हे) शीतल पाटील यांनी खारघर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या, चोरीस गेलेल्या व गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा सीईआयआर पोर्टलवरून आढावा घेतला. चोरीच्या मोबाईलचा शोध घेण्याच्या सूचना आपल्या पोलीस ठाण्याच्या पथकाला दिल्या होत्या.

यानुसार तपास पथकातील अंमलदारांनी हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याचे काम सुरू केले होते. त्यातून पथकाने विविध जिल्ह्यांत पोहचून स्थानिक पोलिसांच्या मदतीने हे ५० मोबाईल हस्तगत केले. यात दोन आयफोन, सातवन प्लस, नऊ सॅमसंग, सात रियल मी, सहा रेडमी, सहा ओप्पो, चार विवो, एक मोटोरोला, तीन पोको, तीन हॉनर, एक आयटेल, एक नोकिया अशा विविध कंपन्यांच्या मोबाईल फोनचा समावेश आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल :** तळोजा भागात राहणाऱ्या एका २५ वर्षीय तरुणाने १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भारत जाधव (वय २५) असे त्याचे नाव असून तळोजा पोलिसांनी त्याच्या विरोधात बलात्कारासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरू केला आहे. जाधवच्या घरी पीडित मुलीच्या कुटुंबाचे येणे जाणे होते. जून २०२४मध्ये त्याने मुलीला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले तसेच त्याबाबत कुणाला काहीही सांगितल्यास मारण्याची धमकी दिली, मात्र जाधवने वारंवार लैंगिक अत्याचार करणे सुरूच ठेवल्याने पीडित मुलीने आईला याबाबतची माहिती दिली. मुलीच्या आईने शुक्रवारी तळोजा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानंतर जाधव या फरार झाला आहे. तळोजा पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## लहानग्यावर भटक्या कुत्र्याच्या हल्ला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा येथे राहणाऱ्या सात वर्षीय बालकाचे भटक्या श्वानाने लचके तोडल्याची घटना घडली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, महापालिका प्रशासनाने त्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

तळोजा फेज दोनमधील सिडकोच्या आसावरी, मारवा, केदार आदी सोसायटी परिसरात भटक्या श्वानांचा वावर वाढल्याचे रहिवासी सांगत आहेत. दरम्यान, शनिवारी सकाळी आसावरी सोसायटीच्या बाहेर अहान अतिक खान हा सातवर्षीय मुलगा खेळत होता. त्याच वेळी मोकाट कुत्र्याने त्याच्या पाठीवर आणि डोक्यावर चावा घेतल्याने त्याला गंभीर दुखापत झाली. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, सात टाके पडले आहेत.

डॉक्टरांनी त्याला प्रतिबंधात्मक लस देऊन व उपचार करून घरी सोडल्याचे जखमी अहानचे वडील अतिक खान यांनी सांगितले. लहान मुलाला कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती मिळताच काही वेळाने श्वानपथक दाखल झाले होते.

## बॅटऱ्या चोरणारे गजाआड

**पनवेल :** कळंबोली स्टील नवीन पनवेल या असलेल्या दोन ट्रकमधून बॅटऱ्या चोरून नेणाऱ्या दोघांना कळंबोली पोलिसांनी अटक केली आहे. हितेश तात्याबा काळे आणि अजय सुरेश पाटील अशी दोघांची नावे आहेत. कळंबोली, सेक्टर १६ येथे राहणारे सुरेश जगदाळे यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. हे नेहमीप्रमाणे त्यांचा ट्रक कळंबोली स्टील मार्केट, मारुती चेंबरच्या समोरील रोडवर पार्क करून ते घरी गेले होते. ही संधी साधत हितेश व अजय या दोघांनी या ट्रकमधून दोन बॅटऱ्या चोरून नेल्या, याबाबतची माहिती त्यांना मिळ्याल्यानंतर त्यांनी हितेश व अजय या दोघांना पकडून कुळंबोली पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यावर पोलिसांनी या दोघांविरोधात गुन्हा नोंद करून त्यांना अटक केली.













पनवेल : राम नवमीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल, खारघर, रांजणपाडा, रोडपाली आदी ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेटी दिल्या. या वेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कामोठे सिग्नलजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** कामोठे सिग्नल जवळ एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कळंबोली पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून त्याचे पूर्ण नाव व पत्ता माहित नाही. उंची पाच फूट, रंग सावळा, केस वाढलेले, बांधा सडपातळ असून फुल बाह्याचा चेक्सचा शर्ट व काळी फुल पॅन्ट तसेच उजव्या हातावर इंग्रजीत डि. के.असे गोंदलेले आहे. तर डाव्या हातावर एचपी असे गोंदलेले आहे. याबाबत माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा सपोनि दत्तात्रय डफळ यांच्याशी संपर्क साधावा.

## हेटवणे जलवाहिनीवर देखभाल व दुरूस्ती; पाणीपुरवठा राहणार बंद

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोतर्फे हेटवणे जलशुद्धीकरण केंद्र व जलवाहिनीवर हाती घेण्यात येणाऱ्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांमुळे बुधवार, ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते गुरुवार, १० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत या २४ तासांच्या कालावधीत द्रोणागिरी, जेएनपीटी, उलवे, खारघर आणि तळोजा नोडसह हेटवणे जलवाहिनीवरील सर्व गावांतील पाणीपुरवठा बंद राहणार आहे तसेच त्यानंतर पुढील २४ तास कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

प्रभावित परिसरातील नागरिकांनी याची नोंद घेऊन पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी व हा कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.



**खारघर : सेक्टर ६ येथील शहा आर्केड सोसायटीत श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापना महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, विपूल चौतालिया, कुणाल संगानी, आदित्य हटगे, दीपक ठाकूर आदी उपस्थित होते.**

## खारघरमध्ये राम नवमी उत्सव

### आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामनवमी आणि भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्ताने एक भव्य रामनवमी उत्सव खारघरमध्ये माजी नगरसेवक निलेश बविस्कर, दुर्गामाता फेरीवाला संस्था आणि श्री दुर्गामाता मंदिराच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सायंकाळी सेक्टर १५ येथील गणेश तलावाजवळ गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून प्रतिकात्मक गंगा आरती करून प्रभू श्री रामांचे दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, खारघर मंडळाचे अध्यक्ष प्रवीण पाटील, उपाध्यक्ष किरण पाटील, महिला मोर्चा सरचिटणीस कंचन बिर्ला, सेक्टर प्रमुख आनंद मोकाशी, मोहन भुजबळकर, संजय शर्मा, प्रिया शर्मा, जहांगीर समाजाचे अध्यक्ष संजय शर्मा, पथ विक्रेता समितीच्या सदस्या प्रतीक्षा माळी, आशा मोरे, राजपुरोहित समाजाच्या महिला अध्यक्षा पुष्पा राजपुरोहित, गुजराती समाजाच्या महिला अध्यक्षा ढाई बेन, उत्तर भारतीय समाजाच्या महिला अध्यक्षा नीतू ओझा, दुर्गा माता मंदिराचे अध्यक्ष प्रेम कुमार सोनी, ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी संघाचे अध्यक्ष मातंग सोनवणे, ज्येष्ठ नागरिकचे अध्यक्ष विलास पटाईत, आरपीआय गटाचे खारघर शहराध्यक्ष संतोष सोनकांबळे, हरिनाम सप्ताहाचे सचिव इंग्रळे महाराज, पंडित आचार्य संघाचे श्यामजी पंडित, शिवसेना नवी मुंबई शहर वाहतूक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप सहदेव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



## शहरात भव्य मिरवणूक रॅली

खारघरमध्ये भव्य दीया फॉर युनिटीमार्फत मिरवणूक काढून प्रभु श्रीरामांचा जयघोष करण्यात आला. खारघर सेक्टर ५ मधील उत्सव चौक ते सेक्टर १५ मधील गावदेवी मैदाना पर्यत्त



ढोल तश्याच्या गजरात रॅली काढण्यात आली. त्यानंतर परमपुज्य भारतानंद सरस्वती यांचे व्याख्यान झाले. या रॉलीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहाभगी होत सर्वांनी रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, उपाध्यक्ष किरण पाटील, युवा मोर्चाचे अध्यक्ष नितेश पाटील, विजय पाटील, शैलेन्द्र त्रिपाठी, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, कुणाल सांगाणी, झूमा चक्रवर्ती, स्नेहल बोधाई, अमित बोधाई, गिरीश गुप्ता, दीपक ठाकूर आदी उपस्थित होते.

## इस्कॉन मंदिरालाही भेट

आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमधील इस्कॉन मंदिराला



भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी इस्कॉन मंदराचे अध्यक्ष सूरदास प्रभू, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, मधुसूदन दास, भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पाटील, युवा मोर्चा मोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, इस्कॉन मंदिर सदस्य व युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय सिंह, आदित्य हतगे, विनोद ठाकूर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# हे जगाला कुठे नेईल?

एकीकडे अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरोधात हजारो नागरिक शनिवारी रस्त्यांवर उतरले तर दुसरीकडे ट्रम्प यांनी लादलेल्या नव्या वाढीव आयात करांमुळे जगभरातील शेअर बाजारांत घसरण सुरू झाली आहे. ही घसरण इतकी मोठी आहे की या घसरणीला १९८७ च्या 'ब्लॅक मंडे' अर्थात 'काळ्या सोमवारा'शी जोडले जाते आहे.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नव्या करांची घोषणा २ एप्रिल रोजी केली. जगभरातील देश अमेरिकेच्या व्यापार-सहिष्णुतेचा गैरफायदा घेतात. त्यामुळे अमेरिकेला नुकसान सहन करावे लागते. म्हणून प्रत्येक देशाच्या आयात कराच्या तोडीसतोड (रेसिप्रोकल) कर अमेरिकाही आकारेल व त्याची अंमलबजावणी या आठवड्यात ९ एप्रिलपासून होईल असे ट्रम्प यांनी जाहीर केले आहे. या धोरणानुसार अमेरिका युरोपीय देशांवर २० टक्के, भारतावर २७ टक्के आणि चिनी उत्पादनांवर ५४ टक्के कर लावणार आहे. ट्रम्प सरकारच्या या जाचक धोरणाचे परिणाम सर्व जगाला सहन करावे लागणार आहेत. त्यामुळेच जगभरातील शेअर बाजार डळमळले आहेत. यापूर्वी १९ ऑक्टोबर १९८७ रोजी जगभरातील शेअर बाजारात एकाच दिवसात सर्वात मोठी घसरण झाली होती. आताही साधारण तशाच प्रकारे जगभरातील प्रमुख शेअर बाजार प्रचंड दबावाखाली दिसून येत आहेत. अमेरिकी आयातीवर ३५ टक्के कर आकारणीचा निर्णय जाहीर करून चीननेही अमेरिकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. वस्तू आणि सेवा यात आघाडीवर असणाऱ्या अमेरिका आणि चीन या दोन देशांतील व्यापारयुद्धाचेही परिणाम अवघ्या जगावर होणार आहेत. या घडामोडींतून चीन आणि हाँगकाँगचे शेअरबाजारही कोसळले आहेत. जपानच्या निक्केईमध्ये सात टक्क्यांची घसरण दिसून आली. याआधी शुक्रवारी अमेरिकेतील शेअरबाजारात घसरण दिसून आली होती. जागतिक बाजारातील विक्रीचा थेट परिणाम भारतीय शेअर बाजारावर झाला. आज सुरुवातीच्या व्यवहारात मुंबई शेअर बाजार पाच टक्क्यांनी घसरला. निफ्टीचीही शंभर अंकांची घसरण झाली. गेल्या दहा महिन्यांतील निफ्टीची ही नीचांकी पातळी असून भारतीय शेअरबाजारांच्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये नाराजी पसरली आहे, परंतु जगाची अर्थव्यवस्था टॅरिफ युद्धाने गटांगळ्या खात असली तरी ट्रम्प यांनी आपल्या टॅरिफ योजनेतून मागे हटण्याचे कोणतेही संकेत दिलेले नाहीत. उलट जगभरातील बाजारपेठेत घसरण झाल्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना ट्रम्प यांनी 'कधी कधी तुम्हाला बरे होण्यासाठी औषध घ्यावे लागते' असे उद्गार काढले आहेत. वास्तवत: अमेरिकेतून जगभरातील देशांमध्ये सेवांच्या स्वरूपात प्रचंड निर्यात होते. त्यामुळे अमेरिकेवर इतर देशांकडून अन्याय होतो व त्यावर तोडगा म्हणून ट्रम्प यांनी वाढीव आयात कराचा निर्णय घेतला हे सगळेच तर्कात कसे बसवायचे असा मोठा प्रश्न विचारला जातो आहे, पण ट्रम्प यांनी मात्र आपल्या या थोर निर्णयामुळे अमेरिका एकतर्फी परकीय व्यापाराच्या जोखडातून मुक्त होणार आहे असे जाहीर करून टाकले आहे. ट्रम्प यांच्या निर्णयांचे जगभरातील अर्थव्यवस्थांवर होणारे परिणाम दूर राहिले, तूर्तास अमेरिकी नागरिकांनीही ट्रम्प आणि त्यांचे अब्जाधीश सहकारी, उद्योगपती इलॉन मस्क यांच्या धोरणांविरोधात आंदोलनाची भूमिका घेतली आहे. अमेरिकेतील ५० राज्यांतील बाराशेहून अधिक ठिकाणी शनिवारी आंदोलकांनी 'हँड्स ऑफ' म्हणत ट्रम्प यांच्या निरनिराळ्या धोरणांचा निषेध केला. ट्रम्प यांच्यावर या साऱ्या घडामोडींचा काही परिणाम होतो का हे येत्या काही दिवसांत दिसेल.**

# देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले

एक अष्टपैलू, चतुरस्त्र प्रतिभेचे श्रेष्ठ गायक कलावंत; गायनाचार्य व अभिजात नाट्यसंगीताच्या परंपरेचे प्रवर्तक. भास्करबुवा बखले यांचा जन्म १७ ऑक्टोबर १८६९ रोजी बडोदे संस्थानातील कठोर या गावी झाला. घरची गरिबी असल्याने प्राथमिक शालेय शिक्षण व त्यानंतर संस्कृत पाठशाळेतले शिक्षण त्यांना फार कष्टाने करावे लागले, पण त्यांनी नाव कमावले. आज त्यांची पुण्यतिथी. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा...



भास्करबुवांचा आवाज लहानपणापासून गोड असल्यामुळे वर्गशिक्षक त्यांना वारंवार संस्कृत श्लोकपठण करायला लावीत. त्यांच्या या गुणांमुळे पिंगळेबुवा नावाच्या हरिदासाकडे त्यांची संगीत शिक्षणाची सोय झाली. भास्करबुवांच्या आवाजाची कीर्ती पुढे किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्या कानी गेली आणि त्यांनी भास्करबुवांना मंडळींत आणले. मंडळीचा मुक्काम इंदूरला असताना भास्करबुवांचा आवाज सुप्रसिध्द बीनकार उस्ताद बंदे अलीखाँ यांनी ऐकला आणि स्वतः होऊन त्यांनी भास्करबुवांना संगीतशिक्षणासाठी गंडा बांधला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रामराज्यवियोग या नाटकात त्यांनी मंथरेची, तर संगीतसौभद्र या नाटकात नारदाची भूमिका केली.

सुमारे दोन वर्षे भास्करबुवांनी किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये काम केले (साधारणतः सप्टेंबर १८८४ ते ऑक्टोबर १८८६). त्यांचा आवाज फुटल्यामुळे त्यांनी ही नाटक मंडळी सोडली. उच्च दर्जाची गायनकला शिकण्यासाठी ते पुन्हा बडोद्यास आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे गायक उस्ताद फैजमहंमदखाँ यांचे त्यांनी शिष्यत्व पतकरले. चिकाटीने, मेहनतीने व निष्ठेने त्यांनी खाँसाहेबांकडून विद्या प्राप्त केली आणि खानदानी गवयी म्हणून लौकीक प्राप्त केला. त्यांनी गायलेली नाथ हा माझा, मम आत्मा गमला ही नाट्यपदे खूप गाजली.

उस्ताद फैजमहंमदखाँकडून संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनावरून भास्करबुवांनी आग्रा घराण्याचे उस्ताद नथ्थनखाँ आग्रेवाले यांचा गंडा बांधला. त्यांच्याच सूचनेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर, भास्करबुवांनी जयपूर घराण्याचे उस्ताद अल्लादियाखाँ यांना गुरू केले आणि त्यांच्या गायकीचे मर्मही आत्मसात केले.

भास्करबुवांनी ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर या तीनही घराण्यांच्या गायकीचे सौंदर्य आत्मसात केले होते. चीजेची मांडणी व रागाचे स्वरूप स्पष्टपणे व्यक्त करणारे जिवंत स्वरालाप हे ग्वाल्हेरचे वैशिष्ट्य; तर भावपूर्ण शब्दोचार व लयबद्ध बोलाची मांडणी हे आग्रा घराण्याचे वैशिष्ट्ये आणि लययुक्त, डौल साधणाऱ्या वैचित्र्यपूर्ण तानांच्या आकृती निर्माण करणारे जयपूर घराण्याच्या गायकीचे वैशिष्ट्य असा त्रिवेणी संगम त्यांच्या गायकीत झाला होता.

ख्याल, ठुमरी, नाट्यसंगीत, सुगम संगीत इत्यादी संगीताचे प्रकार सारख्याच प्रभुत्वाने आणि ढंगदारपणे गाणारे ते कलावंत होते. शास्त्रीय संगीतावर आधारित चिजांच्या चाली वापरून त्यांनी नाट्यगीते संगीतबद्ध केली. सौंदर्ययुक्त आणि समतोल गायकीचा उच्च आदर्श त्यांनी संगीत जगतात निर्माण केला. प्रसन्न व्यक्तिमत्त्व, सौंदर्यपूर्ण गायकी आणि प्रेमळ व दिलदार स्वभाव या तीनही गुणांमुळे भास्करबुवांची ख्याती हिंदुस्थानात सर्वत्र पसरली आणि कलाक्षेत्रात त्यांना सर्वसामान्यता लाभली.

भास्करबुवांनी विद्यादानही मुक्तपणे केले. आरंभी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे ते संगीत गुरू होते. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी यांसारख्या संगीतनाटकांना संगीत देऊन तसेच बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या समर्थ कलावंतांना तालीम आणि मार्गदर्शन देऊन मराठी नाट्यसंगीताचे दर्जेदार स्वरूप त्यांनी घडविले व नाट्यसंगीतात सौंदर्ययुक्त व भरीव अशी कामगिरी केली. नाट्यसंगीत त्यांनी अभिजात संगीताच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यांनीच घडविलेले हे नाट्यसंगीताचे स्वरूप आजही कमी अधिक फरकाने कायम असल्यामुळे त्यांना नाट्यसंगीताचे 'कुलस्वामी' म्हणून संबोधता येईल. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, बागलकोटकर, पाटणकरबुवा बापूराव केतकर वगैरे त्यांची शिष्यमंडळी विख्यात होती. गोविंदराव टेबें, र. कृ. फडके, केशवराव भोळे वगैरे कलावंत त्यांना गुरुस्थानी मानीत असत. रसिकांनी त्यांना 'देवगंधर्व' ही मानाची पदवी दिली.

भास्करबुवांनी धारवाड येथील ट्रेनिंग कॉलेजात काही काळ संगीत शिक्षक म्हणून नोकरीही केली (१९०६-०८). त्यांनी पुणे येथे 'भारत गायन समाज' या संस्थेची स्थापना केली (१९११).

भास्करबुवांचे पुणे येथे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले. 'भारत गायन समाज' ही संस्था दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ 'देवगंधर्व संगीत महोत्सवाचे' आयोजन करते.


**-सुधीर पोटे (मराठी विश्वकोष)**

# प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई

रणजित देसाई यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी कोल्हापूर या ठिकाणी झाला. रणजित देसाई हे प्रसिद्ध मराठी कादंबरीकार होते. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या विशेष प्रसिद्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' आणि थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील 'स्वामी' या कादंबऱ्यांना मराठी साहित्यविश्वात मानाचे स्थान आहे. त्यांना 'स्वामी'कार या नावानेही ओळखले जाते.

मराठीत ऐतिहासिक कादंबरी लेखनाची मोठी परंपरा आहे. रणजित देसाई हे या नामावलीतील फार वरचे नाव. छत्रपती शिवाजी महाराजांवरील त्यांची 'श्रीमान योगी' ही मराठीतील एक श्रेष्ठ कादंबरी गणली जाते.

याशिवाय देसाईंची 'पावनखिंड' ही आणखी एक ऐतिहासिक कादंबरी. त्यांची 'राधेय' ही कर्णावरची कादंबरीही लोकप्रिय आहे. ग्रामीण साहित्यातही त्यांचे मोठे योगदान आहे. 'सवाल माझा ऐका',



'रंगल्या रात्री' या गाजलेल्या चित्रपटांच्या कथाही त्यांनीच लिहिल्या. 'बारी', 'माझे गाव', 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'राधेय', 'लक्ष्यवेध', 'समिधा', 'पावन खिंड', 'राजा रविवर्मा', 'अभोगी', 'प्रतीक्षा', 'शेकरा' या कादंबर्या त्यांनी लिहिल्या. 'रूप महाल', 'मधुमती', 'जल कालवा', 'गंधाली', 'अलख', 'मोरपंखी सावल्या', 'कातळ', 'बाबुलमोरा', 'संकेत', 'प्रपात', 'मेघा', 'वैशाखी', 'आषाढ' हे कथासंग्रह त्यांनी लिहिले.

याचप्रमाणे 'कांचनमृग', 'धन अपुरे', 'पंख झाले वैरी', 'स्वरसम्राट तानसेन', 'गरूडझेप','रामशास्त्री', 'श्रीमानयोगी', 'स्वामी', 'पांगुळवाडा','लोकनायक', 'हे बंध रेशमाचे', 'तुझी वाट वेगळी', 'सावली उन्हाची' इत्यादी नाटकेही त्यांनी लिहिली. त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. १९७३मध्ये पद्मश्री देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या 'स्वामी' या कादंबरीला महाराष्ट्र राज्य पुरस्कार, हरि नारायण आपटे पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले. १९९०मध्ये त्यांना महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित केले. अशा या महान लेखकाचे ६ मार्च १९९२ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# कंपन्यांना दुचाकीसोबत दोन आयएसआय हेल्मेट द्यावे लागणार

कंपन्यांना आता देशात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक दुचाकीसोबत दोन आयएसआय-प्रमाणित हेल्मेट द्यावे लागतील. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या ऑटो समिटमध्ये ही घोषणा केली. लोकांच्या सुरक्षिततेसाठी हे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. याला टू-व्हीलर हेल्मेट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडियाने पाठिंबा दिला आहे. टीएचएमए बऱ्याच काळापासून ही मागणी करत आहे.



दुचाकी वाहनांच्या अपघातात दरवर्षी ६९,०००हून अधिक लोकांचा मृत्यू होतो. त्यापैकी ५० टक्के हेल्मेट न घालण्यामुळे होतात. यावरुन दुचाकी चालवताना हेल्मेट किती महत्त्वाचे आहे हे समजू शकते.

विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, वाहनात हेल्मेट घालण्याची सक्ती का करावी? कंपनीने ते लोखंडी रॉडमध्ये बनवले असते. मेंदूमध्ये १० लाख न्यूरॉन्स आहेत ज्यांना संरक्षणाची आवश्यकता आहे, तर साहेब, हेल्मेट बाईकच्या हँडलसाठी नाही तर तुमच्या डोक्यासाठी आवश्यक आहे.

जर तुम्ही रस्त्यावर हेल्मेट न घालता गाडी चालवली तर वाहतूक पोलीस तुम्हाला थांबवू शकतात आणि तुमची स्कूटर किंवा बाईक बाजूला पार्क करण्यास सांगू शकतात. जर तुम्ही पळून जाण्याचा प्रयत्न केला तर ते तुमच्यासाठी धोकादायक ठरू शकते आणि तुम्हाला जास्त शिक्षा भोगावी लागू शकते. यानंतर तुम्हाला वाहतूक पोलिसांना कागदपत्रे दाखवावी लागतील. तुम्हाला बिल भरावे लागेल. तुमचा खिसा रिकामा होईल आणि तुम्हाला लाजिरवाणेपणाचा सामना करावा लागेल.

बऱ्याचदा आपण हेल्मेट खरेदी करतो, पण शरीराच्या संरक्षणासाठी नाही तर चलन टाळण्यासाठी. त्यामुळे बऱ्याच वेळा लोक फसवणुकीचे बळीही बनतात. आपण हेल्मेट खरेदी करतो पण ज्ञानाच्या अभावामुळे आपण स्थानिक दर्जाचे हलके हेल्मेट खरेदी करतो जे पडल्यावर आपोआप तुटतात. ते तुम्हाला अपघातापासून कसे वाचवेल? म्हणून, हेल्मेट खरेदी करताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

चलन टाळण्यासाठी, कपाळावर हेल्मेट घालून काही फायदा होणार नाही. जर तुम्ही गाडी चालवताना हेल्मेट व्यवस्थित घातले नाही, तर तुम्हाला १,००० रुपये दंड भरावा लागू शकतो. गाडी चालवताना हेल्मेटचा पट्टा बांधला नसल्यास, १,००० रुपयांचे चलन जारी केले जाऊ शकते.

# महान क्रांतिकारक मंगल पांडे

भारतीय इतिहासात अनेक महान क्रांतिकारकांचा जन्म झाला, ज्यांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. मंगल पांडे हे भारताचे पहिले स्वातंत्र्यसैनिक म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. त्यांनी सर्वप्रथम इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. त्यांचे स्वातंत्र्यसैनिक होण्याचे उद्दिष्ट फक्त आणि फक्त भारतातील निष्पाप जनतेची ब्रिटीश राजवटीतून सुटका करणे हेच होते.

मंगल पांडे यांनी सुरू केलेला हा स्वातंत्र्यलढा थांबवण्यासाठी इंग्रजांनी खूप प्रयत्न केले, पण त्यांना पाहून संपूर्ण भारतातील नागरिकांच्या मनात ब्रिटीश राजवटीविरुद्ध क्रांतिकारकाची भावना जागृत झाली.

मंगल पांडे यांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सुरुवातीपासून असे अनेक शूर क्रांतिकारक भारतात जन्माला आले, ज्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि १९व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारत इंग्रजांच्या तावडीतून मुक्त झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यवीर मंगल पांडे यांचा जन्म बिहारमधील बलिया जिल्ह्यातील नगवा नावाच्या गावात झाला. सध्या हे ठिकाण उत्तर प्रदेशातील ललितपूरजवळ आहे. मंगल पांडे यांचा जन्म १९ जुलै १८२७ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दिवाकर पांडे होते, तर आईचे नाव अभय राणी होते.



**निमित्त**

मंगल पांडे सुरुवातीच्या आयुष्यात ईस्ट इंडिया आर्मीमध्ये सामील झाले होते. त्यांना ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात पायदळात शिपाई करण्यात आले. ते ब्रिटीश राजवटीत सैन्यात भरती झाल्यावर भारतात नवीन प्रकारची रायफल सुरू झाली. ज्या वेळी ही रायफल लाँच करण्यात आली, त्या वेळी तिचे नाव एनफिल्ड रायफल असे होते. या रायफलमधील ग्रीस प्राण्यांच्या चरबीपासून बनवल्याचे वृत्त पसरले आणि मंगल पांडे हे प्राणी गायी आणि डुक्कर असल्याचे कळताच भयंकर संतापले.

या रायफलमधील वंगण तोंडातून काढून टाकावे लागले, अशा प्रकारे हिंदू-मुस्लिम धमियांच्या धार्मिक श्रद्धांशी खेळल्याने मंगल पांडे यांना खूप राग आला आणि त्याने इंग्रजांचा बदला घेण्याचा विचार केला.

रायफलच्या ग्रीसमध्ये प्राण्यांच्या चरबीचे काडतूस वापरल्याच्या निषेधार्थ मंगल पांडे यांनी २९ मार्च १८७५ रोजी एका ब्रिटिश अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले. यानंतर स्वत:वर गोळी मारण्याचा प्रयत्न केला, कारण त्यांना कोणत्याही ब्रिटीश शासकाच्या हातून आपला जीव द्यायचा नव्हता, पण ते ब्रिटिशांच्या हाती पकडले गेले.

या घटनेसाठी मंगल पांडे यांना तुरुंगात टाकण्यात आले होते, जिथे त्यांना बरे होण्यासाठी जवळपास एक आठवडा लागला. असे म्हटले जाते की मंगल पांडे यांना कोणत्याही प्रकारचे औषध दिले गेले नाही, कारण त्यांनी एका ब्रिटीश अधिकाऱ्याची हत्या केली होती आणि त्यासाठी त्यांना शिक्षा दिली होती. यानंतर मंगल पांडे यांना न्यायालयात हजर करण्याचा निर्णय देण्यात आला. कोर्टाच्या निर्णयानंतर त्यांना १८ एप्रिल १७५७ रोजी फाशी देण्यात यावी, असा आदेश कोर्टाने दिला होता, परंतु मंगल पांडे यांना ८ एप्रिल रोजी फाशी दिली गेली. त्यांची भीती अधिकाऱ्यांना इतकी वाटायची की मंगल पांडेच्या मृत्यूनंतरही त्यांच्या मृतदेहाजवळ जाण्यास इंग्रज घाबरत होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर मंगल पांडे यांचा भारत सरकारने सन्मान केला. या सन्मानाअंतर्गत एक टपाल तिकिट काढण्यात आले, ज्यावर मंगल पांडे यांचा फोटोही होता. (साभार : इंटरनेट)


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दररोज ४० मिनिटे कमी बसल्याने शरीरात होईल 'हा' बदल!

दररोज नेहमी बसता त्यापेक्षा एक तास कमी वेळ बसल्याने पाठदुखी कमी होण्यास मदत होऊ शकते, असं 'बीएमजे ओपन'मध्ये प्रकाशित झालेल्या २०२४च्या एका अभ्यासात म्हटलंय. थोडक्यात तुम्ही दिवसभरात तुम्ही जेवढा वेळ बसता, त्यापेक्षा फक्त ४० मिनिटे कमी बसण्याची आवश्यकता आहे. सोपं वाटतंय ना? पण असं केल्यावर आपल्या शरीराच्या इतर भागांवर काय परिणाम होतो? जाणून घेऊया



'वेदा रिहॅबिलिटेशन ॲण्ड वेलनेस'चे वेलनेस तज्ज्ञ तुषार बिष्ट म्हणतात की, सतत बसून राहण्याच्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. कारण- खूप वेळ बसल्यामुळे रक्ताभिसरण मंद होते, ज्यामुळे रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलचं प्रमाण वाढतं. हालचालीअभावी स्नायू व सांधे कमजोर होतात आणि त्यामुळे हाडांची घनता कमी होते. विशेषतः चुकीच्या पोश्चरमध्ये जास्त वेळ बसल्यास कंबरदुखी सुरू होते आणि कंबरेखालील स्नायू ताणले जातात, असं ते सांगतात.

शारीरिक हालचालींमुळे शरीरात एंडॉर्फिन नावाचं रसायन तयार होते, जे मानसिक आरोग्य सुधारतं. ते असंही म्हणतात की, कमी हालचाल केल्यानं मानसिक समस्यांचं प्रमाण वाढतं. जर आपण सतत निष्क्रिय राहिलो, तर कालांतरानं वजन वाढू शकतं, कारण शरीराची जेव्हा हालचाल होत नाही तेव्हा कमी उष्मांक (कॅलरीज) वापरले जातात.

बिष्ट सांगतात की, फक्त ४० मिनिटांनी बसण्याचा एकंदर वेळ कमी केल्यानं शरीरात रक्ताभिसरण सुधारतं, रक्तदाब कमी होतो आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. ॲक्टिव्ह राहिल्यानं वजन नियंत्रणात ठेवायला मदत होते आणि डायबिटीजसारखे मेटाबॉलिक आजार होण्याचा धोका कमी होतो, असं त्यांनी सांगितलं. ते पुढे म्हणाले की, मन प्रसन्न वाटतं. लक्ष एकाग्र राहतं आणि अर्थातच पाठदुखीही कमी होते.

सक्रिय विश्रांती खूप उपयोगी ठरतात, कारण त्या शरीराला आरामाच्या स्थितीतून बाहेर काढतात आणि मन ताजं करतात. पाच ते सात मिनिटं शांतपणे, चालल्यास लक्ष परत केंद्रित होऊ लागतं आणि अभ्यासांनुसार यामुळे कामाची क्षमता वाढते, असं बिष्ट म्हणाले. ते असंही म्हणाले की, हालचाल असलेल्या इनडोअर गेम्समध्ये भाग घ्यावा, जसं की टेबल टेनिस. ऑफिसमध्ये असे खेळ ठेवले आणि फक्त पाच मिनिटांचा खेळही खेळला तरी त्यामुळे टीमवर्क वाढतं, माणसांमध्ये उत्साह निर्माण होतो, काम मजेशीर वाटतं आणि कामाची गुणवत्ता सुधारते.

# कर्जतमध्ये श्री रामाच्या भव्य पुतळ्याचे अनावरण

## रामप्रभूंचा आदर्श समोर ठेवल्यास जीवन सुखकर होईल -आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले परंतु ते शरीराने मिळालेले स्वातंत्र्य होते, मात्र गेल्या वर्षी आयोध्येला श्रीराम मंदिर आणि श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली व खऱ्या अर्थाने आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते. दोन दिवस मला पंतप्रधान करा. मी आयोध्येत श्रीराम मंदिर उभारीन आणि काश्मीर मधील ३७० कलम रद्द करीन. त्यांचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले. श्री रामांचा आदर्श समोर ठेवल्यास आपले जीवन नक्कीच सुखकर होईल.असे स्पष्ट प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी येथे केले.

दहिवली विभागातील गणेश घाटाच्या परिसरात श्रीरामची तीस फूट उंचीची मूर्ती साकारली आहे. या मूर्तीच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार सुरेश लाड यांच्या विशेष उपस्थितीत कल्याण मठाचे महंत चंद्रदेवदास बाबाजी आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते श्रीरामाच्या मूर्तीचे अनावरण करून लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी धर्मेंद्र महाराज, संतोष भोईर, विजय पाटील, संभाजी जगताप, मंगेश म्हसकर, भाई गायकर, दीपक बेहेरे, शरद लाड, राजेश लाड, राहुल डाळिंबकर, संकेत भासे, आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सकाळी मंत्रोच्चारांनी संपूर्ण परिसरात भक्तिभाव, सात्विकता आणि दिव्यतेचे वातावरण निर्माण झाले. कर्जत शहरातील अकरा श्रद्धावान जोडप्यांनी या पवित्र यज्ञामध्ये सहभागी होण्याचा मान मिळवला. प्रभू



श्रीरामांच्या भव्य मूर्तीसमोर नतमस्तक होण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

भगव्या पताका, रामनामाचा गजर आणि शंखध्वनीने संपूर्ण गणेश घाट परिसर राममय झाला होता. सायंकाळी लोकार्पण सोहळ्याच्या प्रसंगी दहिवली विचार मंचाच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या वेळी मूर्तिकार रूपेश नार्वेकर यांचा सत्कार करण्यात आला.

माजी आमदार सुरेश लाड यांनी, कर्जतचा विकास चांगल्या प्रकारे होत आहे. श्रीरामच्या मूर्तीने नवचैतन्य निर्माण होईल. मात्र कर्जत शहरात पाण्याचा प्रश्न उद्भवत आहे. त्यासाठी काही तरी करावे.' असे सूचित केले. कर्जत शहरात पाण्याचा सोडविण्याचा नक्की प्रयत्न करू. आता कर्जत शहरासाठी नवीन ५७ कोटी रुपयांची पाणी योजनेचे काम सुरु आहे. हे काम वीस टक्के झाले आहे. या योजनेसाठी आपण सर्वांनी सहकार्य करा. म्हणजे भविष्यात कधीही पाण्याचा प्रश्न भेडसावणार नाही' असे आमदार महेंद्र थोरवे यांनी या वेळी सांगितले.

या प्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, अशोक ओसवाल, संतोष भोईर, रमेश मते, संभाजी जगताप, पंकज पाटील, अशोक कारुळकर, धनंजय बेडेकर, अतुल बडगुजर, दीपक बेहेरे, भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, मंगेश म्हसकर,दिलीप ताम्हाणे, सुनील जाधव, दिलीप गडकरी, प्रवीण गांगल, मधुकर सुर्वे, मीना थोरवे, सायली शहासने, नीता लाड, मनीषा थोरवे, अशोक थोरवे, गणेश ठाकरे, वैभव सुरावकर, विकास चित्ते, ज्ञानेश्वर करणूक, अर्चिस पुरोहित उपस्थित होते.

### शॉर्टकट मारणाऱ्या वाहनचालकांवर

# वाहतूक पोलिसांची कारवाई

**खालापूर : बातमीदार**

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर शिळफाटा खोपोली येथे प्रवेश बंद असलेल्या मार्गातून धोकादायक पद्धतीने दुचाकी, कार नेणाऱ्या चालकाना वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उचलण्याने बेशिस्त चालकांना चाप बसला.

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर ते खोपोली जाताना एकेरी वाहतूक असताना देखील शिळफाटा येथे अनेक दुचाकीस्वार, कार शॉर्टकट मारत विरुद्ध दिशेने वाहन चालवत नेतात. या मार्गात पाताळगंगा नदिवर अरुंद पुल असून खोपोलीच्या दिशेने वाहन जाताना विरुद्ध बाजूने वाहन आल्याने अनेकदा किरकोळ अपघाताच्या घटना घडल्या आहेत याशिवाय वाहन चालकांमध्ये बाचाबाचीचे प्रकार देखील नेहमी घडत असतात.

खालापूर पनवेलच्या दिशेने जाण्यासाठी इंदिरा चौकातून मार्ग असताना देखील वाहनचालक निवडत असलेला शॉर्टकट जीवाव बेतण्याची शक्यता असल्याने अशा वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येते होती .हाकेच्या अंतरावर पोलीस चौकी असताना देखील वाहन चालक नियम पायदळी तुडवत असल्याने वाहतूक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

रविवारी वाहतूक पोलिसांनी संध्याकाळी प्रवेश बंदीतून जाणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू केली. वाहतूक पोलीस कारवाई करत असल्याचे पाहून अनेक वाहन चालक आणि पुन्हा उलट्या दिशेने पळ काढला. कारवाई मध्ये सातत्य वाहतूक पोलिसांनी ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# परळी येथे भावाच्या मेव्हण्याने केली दागिन्यांची चोरी

## आरोपीला पाली पोलिसांनी पकडले

**पाली: प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील परळी गावात एका घरातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाली. पाली पोलीस स्टेशन कडून मिळालेल्या माहितीनुसार २४ मार्च ते १ एप्रिल च्या दरम्यान ही घटना घडली. आश्चर्याची बाब म्हणजे भावाच्या मेव्हण्यानेच ही चोरी केल्याचे उघडकीस आले असुन या चोराला पाली पोलिसांनी मुद्देमालासह पकडले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की राहुल तुकाराम काळभोर, परळी, ता. सुधागड येथे आपल्या कुटुंबासोबत राहतात. त्यांच्या घरातील कपाटातून २ तोळे २ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले चोरीला गेलेले त्यांना समजले असता त्यांनी पाली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावेळी त्यांनी आपल्या भावाचा मेहुणा ऋषिकेश रामचंद्र मांडवकर रा. उंबरवाडी, यांच्यावर संशय व्यक्त केला.

पाली पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सूर्यवंशी, पोलीस हवलदार दीपक पाटील, पोलीस शिपाई अजित लामखेडे, श्री. भापकर, व श्री. बजबळकर यांनी सदर संशयित फरार आरोपीला खोपोलीतून ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याला अटक करून दोन तोळे दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले असा गुन्हयातील एक लाख २५ हजार रुपये किमतीचा सर्व मुद्देमाल त्याच्याकडून जप्त करण्यात आला

# रेल्वेची धडक लागून तरुणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

रेल्वेची धडक लागून ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना माणगाव तालुक्यात घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, ६ एप्रिल रोजी गोवा संपर्क क्रांती या गाडीच्या समोर आल्याने मयत सचिन कृष्णा मुंढे (वय ३०, रा. कशेणे) यास ठोकर लागून लहान मोठ्या गंभीर स्वरूपाच्या दुखापती होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स. ई. राठोड करीत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **बाळकृष्ण दयानंद पाटील व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : वशेणी (५५३३४४)
(PU-ID : 12737930147), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२३/४ खाते क्रमांक : ६९४ | १ | ०.२७.३० पो.ख. ०.०१.६० **एकुण ०.२८.९०** | ६.४५ |

**एकुण क्षेत्र ०.२८.९० गुंठयाचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०४/२०२५

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१


# आदर्श आगरी युवक मंडळाच्या वधू-वर केंद्राचे नेरळमध्ये उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

श्रीराम जन्मोत्सवाच्या मुहूर्तावर आदर्श आगरी युवक मंडळाचे वधु-वर सूचक केंद्राच्या१२ व्या शाखेचे नेरळ येथे उद्घाटन करण्यात आले. नेरळ येथील प्रकाश गवळी आणि पूनम गवळी दांपत्याने वधू वर सूचक केंद्र सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील तरुण-तरुणींच्या विवाहातील अडचणी दूर करण्याचे हेतूने आगरी समाजाच्या आदर्श आगरी युवक मंडळ मुंबई यांनी पुढाकार घेत आदर्श युवक मंडळाच्या वधु-वर सुचक केंद्र बारावी शाखा नेरळ येथे सुरू केली. श्रीराम जन्मोत्सवच्या पवित्र मुहूर्तावर आदर्श आगरी युवक मंडळ



संलग्न आदर्श अग्रसेन वधु-वर सूचक केंद्र नेरळ शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी आदर्श अग्रसेन मासिकाचे कार्यकारी संपादक नरेंद्र म्हात्रे, दिलीप पाटील, यांच्यासह आगरी समाजाचे स्थानिक नेते अरविंद पाटील, सावळाराम जाधव, शिवराम महाराज तुपे, सुरेश गोमारे, रमेश म्हसकर, पत्रकार संतोष पेरणे,संतोष जामघरे, महेश कोळंबे यांच्यासह मान्यवर यांच्यासह वधू वर यांचे आई वडील बहुसंख्येने उपस्थित होते.

मंडळाच्या वधू वर केंद्राचे प्रमुख दिलीप पाटील यांनी आदर्श आगरी युवक मंडळाच्या ११ शाखाचा आढावा घेतला,तसेच वधू आणि वर यांची नोंदणी पद्धत याबाबत माहिती दिली. संस्थेच्या वतीने आतापर्यंत १०१ वधू वर सूचक मेळावे भरवण्यात आले असल्याची माहिती देवून कर्जत तालुका केंद्र देखील लग्न जुळवण्यासाठी पुढाकार घेईल असा आशावाद व्यक्त केला.

# संगीतमय रामकथेने परिसर झाला राममय; रसिक मंत्रमुग्ध

**कर्जत: प्रतिनिधी**

श्री रामनवमीच्या मुहूर्तावर कर्जत शहरातील दहिवली येथील उल्हास नदीवर असलेल्या गणेश घाटावर साकारलेल्या श्री रामाच्या मूर्तीच्या लोकार्पण सोहळ्या निमित्त 'मन हो राम रंगी रंगले 'या भावगीतांच्या संगीत मैफिलीचे आयोजन केले होते. या संगीत मैफलीत श्री रामांच्या गीतांनी या मैफलीत रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.

द स्वर बरसात प्रस्तुत विवेक भागवत निर्मित संगीत मैफलीत टीव्ही स्टार गायक गौरव महाराष्ट्राचा फेम नचिकेत देसाई, सारेगमप फेम जयश्री करंबेळकर, श्रीरंग भावे यांनी आरंभी वंदिन., उजळून आलं., स्वये श्री राम



प्रभू ऐकती, राम जन्माला, कौश्यलेचा राम. स्वयंवर झाले सीतेचे. अंजनीच्या सूता. रामा रघुनंदना., सेतू बांधा रे, प्रभू रामान, रामजीकी निकली.,. अशी एका पेक्षा एक सरस श्रीरामाची गुण गौरव गीते सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना सिंथेसायझरवर अमित गोठीवरेकर, नरेंद्र सकटे, बासरीवर मंदार तांडेल, ऑक्टोपॅडवर प्रवीण भोपी, ढोलक व पखवाजवर - मनिष ठुंबरे आणि तबल्यावर विवेक भागवत यांनी साथ संगत केली.

निवेदिका अनुया गरवारे यांनी वेगळ्या शैलीत श्रीरामांच्या जीवनातील आठवणींना उजाळा देत निवेदन करून वातावरण निर्मिती केली.

याप्रसंगी माजी आमदार सुरेश लाड, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगराध्यक्ष शरद लाड, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, अशोक ओसवाल, भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, मंगेश म्हसकर, संकेत भासे, अभिषेक सुर्वे, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भैरवनाथ यात्रा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी भारत गोरेगावकर

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील श्री देव भैरवनाथ महाराज यांचा यात्रात्सोव यंदा शुक्रवार ११ एप्रिल रोजी भरणार असून या यात्रेच्या उत्सव समिती अध्यक्षपदी पत्रकार भारत गोरेगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



सर्व धर्म समभावाचे प्रतिक अशी ओळख असलेल्या गोरेगाव मधील श्री देव भैरवनाथ महाराज यांची यात्रा यंदा शुक्रवार ११ एप्रिल रोजी संपन्न होत आहे उंच बगाडावरती फिरणारी लाट या यात्रेचे खास आकर्षण आहे. पूर्वे कडील जंगलातून वतनदार मंडळी चालत खांद्यावरून लाट घेऊन येण्याची पंरपरा आहे दुसऱ्या दिवशी ती लाट बगाडावरती चढवून फिरविण्यात येते यावेळेस भाविकांची मोठी गर्दी पहायला मिळते. यावर्षी रेपोली गावाच्या हद्दीत लाट असून गुरुवार १० एप्रिल रोजी लाट आणली जाणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतीची मिळकत आमचे अशिलांनी सदर शेतीच्या मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरांत नमूद असलेल्या जमीन मालकांचे वारसांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे-मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. | उपविभाग नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१ | ३ | ०-५८-७० पो.ख. ०-०८-६० **एकूण ०-६७-३०** | १०=०० |

सदर शेतजमिनीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्त खत, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आंत योग्य त्या सकृत दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर शेतजमिनीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :-०८/०४/२०२५

सही/-
**ॲड. स्वप्नेश संजय घरत**

ऑफिस क्र. १, पहिला मजला, ए विंग, यशोकिरण को.ऑ.हौ. सोसा., सावरकर चौक, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड. मोबा. ९६९९०३६४३२/८३६९४९४३४१



**Rayat Shikshan Sanstha's**
## Professional College, Kamothe
Sec-11, Plot - 41, Kamothe, Panvel

**Notice Inviting E-Tender**

Rayat Shikshan Sanstha's Professional College, Kamothe - Panvel, Invites E-tenders for the Interior Work of college building from reputed contractors. Detail of tender available on https://edumart.sets.co.in/

Chairman
**Professional College,**
Kamothe, Panvel



## उरण नगरपरिषद
### निविदा सूचना

उरण, उरण नगरपरिषद मान्सूनपूर्व तयारी अंतर्गत शहरातील पावसाळी नाले/गटारे साफसफाईचे एकूण ८ कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ८-४-२५ पासून दिनांक २१-४-२५ पर्यत सायं. ५.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

**१) इसारा रक्कम :-** कामाची. इसारा रक्कम धनाकर्ष / रोखीने नगरपरिषदेच्या लेखा विभागांत दिनांक ८-४-२५ ते २१-४-२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत भरणेची आहे. ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निविदा विचारांत घेतल्या जाणार नाहीत.

**२) कोरे निविदा नमुने :-** कोऱ्या निविदांचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निविदा शुल्क (न परतीचे) रोखीने भरणा केल्यास दिनांक १७-४-२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातून उपलब्ध होतील. निविदा नमुने कोणत्याही परिस्थितीत पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.

सदर कामाच्या अटी/शर्ती आणि सविस्तर निविदा सूचना बांधकाम विभागातून उपलब्ध होणार असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

दिनांक :- ७-४-२०२५
जा.क्र. उनप/बांवि/६१/२०२५-२६

सही/-
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद उरण



## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहीर सूचना देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये ऑनलाईन पध्दतीने व प्रत्यक्ष मालमत्ता कराची देयके बजावणेत येत आहेत.

**मा. सर्वोच्च न्यायालय, स्पेशल लीव्ह पिटीशन क्रमांक १०८४९/२०२३ मधील सिव्हिल अपील क्रमांक ६०६५ / २०२४ मधील, दिनांक २९/०४/२०२४ रोजीचा** https://www.panvelcorporation.com **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.** कृपया त्यांचे अवलोकन करावे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सन २०२५-२०२६ आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची देयके तयार (जनरेट) करणेत आलेली आहेत. ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा PMC TAX - APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत. सदर प्रमाणे कार्यवाही न झाल्यास ऑनलाईन प्रसिध्दी दिनांकापासून देयके बजावण्यात आलेली आहेत असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. **तसेच, दिनांक ३१/०५/२०२५ पर्यंत चालू वर्षाचा एकरक्कमी मालमत्ता कर भरणा केल्यास चालू मागणीवर ५% सुट देण्यात येते व मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट देण्यात येते.**

सर्व मालमत्ता धारकांनी आपली देयके ऑनलाईन किंवा ऑफलाईन व्दारे प्राप्त करुन घेऊन मालमत्ता कराचा भरणा लवकरात लवकर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.

दिनांक : ०७/०४/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.१४९/१४९/२०२५

सही/-
**उपायुक्त (कर)**
पनवेल महानगरपालिका

# समुद्राची वाढती पाणी पातळी शहरांसाठी धोकादायक

**नवी मुंबई : बातमीदार**

समुद्राची वाढती पातळी आणि त्याचा किनारी भूजल पातळीवरील परिणाम आणि किनारी धूप यावर केंद्र सरकार धोरणात्मक चौकटीवर काम करत आहे. पर्यावरण वॉचडॉग नॅटकनेक्ट फाउंडेशनने पीएमओ वेबसाइटद्वारे तक्रार दाखल केली आहे. समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे भूजल पातळी वाढू शकते. त्यामुळे पूर येऊ शकतो या संशोधन अहवालांवर चिंता व्यक्त केली.

नवी मुंबईतील पर्यावरण संस्था असलेल्या नेटकनेक्ट संस्थेचे संचालक बी.एन. कुमार यांनी, न्यूझीलंडमधील नवीन संशोधन निष्कर्ष धोक्याची सूचना देत आहेत. नवी मुंबई शहरातदेखील किनाऱ्याची झीज कमी करणाऱ्या, रोखणाऱ्या कांदळवनांची कत्तल करून सर्रास विकास केला जात आहे. त्याचा धोका त्या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना भविष्यात होणार असल्याचे कुमार यांनी पंतप्रधान कार्यालयाच्या लक्षात आणून दिले.

आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी अंतर्गत भागातून येणाऱ्या पुरांसाठी सतर्क राहण्याची वेळ आली आहे, असे कुमार यांनी त्यांच्या दाखल्यात म्हटले आहे. न्यूझीलंडमधील डुनेडिन या किनारी शहरावर लक्ष केंद्रित करणाऱ्या एका नवीन पेपरमध्ये असे म्हटले आहे की समुद्राच्या पातळीत वाढ भूजल पातळीत बदल करू शकते आणि त्यामुळे अंतर्गत पूर येण्याचे धोके वाढू शकतात.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने उत्तर देताना म्हटले आहे की, हे मंत्रालय समुद्राची वाढती पातळी, किनारी धूप आणि किनारी भूजल पातळीत घट होत असल्याबद्दल अर्जदाराने उपस्थित केलेल्या धोक्याविषयी मंत्रालयाच्या धोरण चौकटीच्या विकासादरम्यान हे मुद्दे विचारात घेतले जातील, असे परिणाम मूल्यांकन संचालक अरविंद कुमार अग्रवाल यांनी स्वाक्षरी केलेल्या उत्तरात म्हटले आहे.

हे संशोधन निष्कर्ष अलिकडेच एजीयूने प्रकाशित केलेल्या विज्ञान मासिकाने प्रकाशित केले आहेत, जे पृथ्वी आणि अवकाश विज्ञानातील अर्धा दशलक्षाहून अधिक समर्थकांना आणि व्यावसायिकांना पाठिंबा देणारे जागतिक समुदाय आहे. दक्षिण डुनेडिनमध्ये आधीच अधूनमधून पूर येत आहेत जे समुद्र पातळी वाढल्याने आणखी आव्हानात्मक बनतील. अहवालात म्हटले आहे की, संशोधकांनी हे शहर हवामान बदल आणि वाढत्या समुद्रांना प्रतिसाद देणाऱ्या आणि जुळवून घेणाऱ्या न्यूझीलंड समुदायांसाठी एक पोस्टर चाइल्ड म्हणून वर्णन केले आहे. कुमार म्हणाले, शहरी स्पंज म्हणून काम करणाऱ्या आणि नदीच्या पूरक्षेत्रांचे रक्षण करणाऱ्या आपल्या पाणथळ जागांचे जतन करण्याच्या आपल्या दीर्घकालीन मागणीला बळकटी देतात.

म्हणूनच पायाभूत सुविधांच्या विकासाच्या बहाण्याने जलसाठे बुजविण्याऐवजी पाण्याचा विस्तार होण्यासाठी जागा राखण्याची तातडीने गरज आहे, असे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. पर्यावरणविरोधी धोरणे आणि पर्यावरणीय आपत्तींना हलक्यात घेण्याऐवजी, समुद्राची पातळी वाढणे आणि भूगर्भातील पूर या दुहेरी धोक्यांसाठी सरकारने स्वतःला तयार करण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

याचबरोबर, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने भारताच्या भूगर्भीय सर्वेक्षणासह समुद्राच्या वाढत्या पातळीचा अभ्यास करताना किनारी भूजल तक्त्यांचे परीक्षण केले पाहिजे, असे ते म्हणाले. किनारपट्टीवरील धूपबाबत सरकारच्या एका संक्षिप्त अहवालाव्यतिरिक्त, देशात सात हजार ५०० किमीपेक्षा जास्त लांबीची समुद्रकिनारी असली तरी समुद्राच्या वाढत्या पातळीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांवर कोणतीही गंभीर चर्चा झालेली नाही, असा युक्तिवाद नॅटकनेक्टने केला.

शिवाय महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि उरण तालुक्यांसारख्या भागात, आंतरभरतीच्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण झाल्यामुळे भातशेती पाण्याखाली जाऊ लागली आहे आणि सखल पातळीच्या भागात पूर येऊ लागला आहे, असे सागर शक्तीचे संचालक नंदकुमार पवार यांनी निदर्शनास आणून दिले. तरीही अधिकारी वाढत्या समुद्राच्या पातळीसह वाढत्या संकटाकडे डोळेझाक करत आहेत, असे त्यांनी खेद व्यक्त केला.



*दरम्यान, आणखी एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की २०४० पर्यंत, वाढत्या समुद्रांच्या पाण्यामुळे मुंबई, यानम आणि थुथुकुडीचा १० टक्क्यांपेक्षा जास्त भाग बुडून जाईल; पणजी आणि चेन्नईच्या ५%-१०%; आणि कोची, मंगळुरू, विशाखापट्टणम, हल्दिया, उडुपी, पारादीप आणि पुरी येथील १%-५%. २१०० मध्ये, मंगळुरू (टियर-२ शहर), हल्दिया, पारादीप, थुथुकुडी आणि यानम (शहरे) येथे पूरस्थिती जास्त असेल, असे बेंगळुरूस्थित सेंटर फॉर स्टडी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड पॉलिसी (CSTEP) च्या अभ्यासात नॅटकनेक्टने निदर्शनास आणून दिले आहे.*

## संशोधन निष्कर्षात धोक्याची सूचना

## केंद्र सरकारने घेतली दखल



## आगामी सण, उत्सवांसंदर्भात बैठक

**पनवेल : वार्ताहर**

आगामी सण व उत्सवानिमित्त पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटील तसेच उत्सव साजरा करणारे आयोजक, पदाधिकारी यांची बैठक मंथन हॉल येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली होती.

या बैठकीला उपस्थित पोलीस अधिकारी वर्गाने सहभागी झालेल्या उपस्थितांना मार्गदर्शन व सूचना करताना सांगितले की, पालखी/मिरवणूकीकरिता वाहतूक शाखा व इतर संबंधित विभागाकडील आवश्यक त्या परवानगी प्राप्त करून घेणे, मिरवणुकीमध्ये सामील होणारे लहान मुले/मुली यांची काळजी घेणे, तसेच महिलांची छेडछाड होऊ नये याकरिता स्वयंसेवकांची नेमणूक करावी. पालखी/मिरवणूक कार्यक्रम वेळेत सुरू करून वेळेत संपवावी. पालखी/मिरवणुकीमध्ये डीजे/डॉल्बीचा वापर करू नये. ध्वनिक्षेपका संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे पालन करावे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अफवांवर विश्वास ठेऊ नये, काही आक्षेपार्ह वाटल्यास तत्काळ पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याकरिता कायद्याचे पालन करावे. शासन परिपत्रकाप्रमाणे सण/उत्सव साजरे होतील याची दक्षता घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या बैठकीत ४५ पोलीस पाटील/ आयोजक/ पदाधिकारी उपस्थीत होते.

# नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे, कोळीवाडे कायमस्वरूपी करावेत

## आमदार मंदा म्हात्रे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे व कोळीवाड्यातील नागरिकांना जुन्या घरांची पुनर्बांधणी करताना महापालिका व सिडकोच्या माध्यमातून कारवाई केली जाते. यामुळे घरांची पुनर्बांधणी करताना नाहक त्रास होत आहे. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे व कोळीवाडे कायमस्वरूपी करा, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्याकडे केली. याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दाखवल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.



प्रकल्पग्रस्तांची घरे व कोळीवाडे कायमस्वरूपी करा, अशी मागणी आमदार म्हात्रे यांनी केली आहे. प्रकल्पग्रस्तांसह नवी मुंबईकरांना न्याय देण्याच्या अनुषंगाने तसेच महापालिका क्षेत्रातील ईडब्ल्यूएस आणि एलआयजी घरांच्या समस्यांबाबत त्या ठिकाणचे रहिवासी, मंदिर समिती अध्यक्ष, पदाधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत काही दिवसांत बैठक घेऊन कायद्याच्या चौकटीत बसवून हा प्रश्न सोडविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे त्या म्हणाल्या.

**पुनर्विकासाचा प्रश्न**

२०११ पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत दर्जा मिळाला, परंतु शेकडो वर्षे असलेला प्रकल्पग्रस्तांच्या जुन्या घरांच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित आहे. वाढत्या कुटुंबांमुळे या जुन्या घरांची पुनर्बांधणी करताना महापालिका आणि सिडकोच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सांगितले.

# जेएनपीए आणि एनएसआयसीटी यांच्यात समन्वय

**नवी मुंबई, उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून ओळखले जाणारे जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए), संयुक्त अरब अमिरातीची (यूएई) सरकारी कंपनी डीपी वर्ल्डचा भाग असलेल्या एनएसआयसीटीसोबत दर करारावर सहमती दर्शवली आहे. एनएसआयसीटी जेएनपीएमध्ये पीपीपी तत्वावर कंटेनर टर्मिनल चालवित आहे.

जेएनपीए आणि युएई सरकारच्या मालकीचे बंदर आणि टर्मिनल ऑपरेटर, डीपी वर्ल्ड यांनी सामंजस्य कराराला अंतिम स्वरूप दिले आहे, ज्याच्या व्यापक रूपरेषांना बोर्डाने पूर्वी मान्यता दिली होती. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या, दीर्घ कायदेशीर लढाईचा प्रश्न दोन्ही पक्षांच्या प्रयत्नांनी समधानपूर्वक सौहार्दपूर्णपणे सोडवण्यात आला आहे. हे बंदर क्षेत्रातील पीपीपीसाठीदेखील एक सकारात्मक संकेत असेल. या कराराच्या तपशीलांवर काम सुरू असून, यामध्ये एनएसआयसीटीकडून अतिरिक्त कार्गो वचनबद्धता समाविष्ट असेल, ज्यामुळे त्यांना व्हॉल्यूम डिस्काउंटसाठी पात्र बनता येईल जे व्हॉल्यूम विशिष्ट पातळी गाठल्यानंतर सुरू होतील. टॅरिफ वादाच्या आधी व्हॉल्यूम निम्म्याहून अधिक कमी झाले असल्याने, त्यामुळे आता कार्गो व्हॉल्यूममध्ये लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. ऑपरेटरला मिळणारा महसूल कराराच्या उर्वरित कालावधीत वाढीव वाहतुकी विरुद्ध मिळणाऱ्या सवलतींद्वारे अंशतः वसूल केला जाईल.

१९९७ मध्ये, जेएनपीएने डीपी वर्ल्डला पीपीपी तत्वावर खाजगी टर्मिनल चालविणयसाठी कन्सेशन दिले. डीपी वर्ल्डचे स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) असलेल्या एनएसआयसीटीने जेएनपीएसोबत ३० वर्षांचा कन्सेशन करार केला. हा भारतातील बंदर क्षेत्रातील अशा प्रकारचा पहिला सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) करार होता.

## बंदर क्षेत्रात सार्वजनिक खासगी भागीदारीला चालना

२००५ मध्ये रॉयल्टी संदर्भात वाद उद्भवला तेव्हा खर्च म्हणून पूर्ण रॉयल्टी नाकारण्यात आली, त्यामुळे एनएसआयसीटीने जेएनपीए विरुद्ध अंदाजे २६५३ कोटी रुपयांचे दावे दाखल केले. मध्यस्थी कार्यवाही आणि सामंजस्य प्रक्रियेनंतर एक तडजोड सूत्रावर सहमती झाली. सवलतीच्या उर्वरित कालावधीपर्यंत भविष्यातील व्हॉल्यूम-आधारित रॉयल्टी सवलतींद्वारे समझोत्यात ७०५ कोटी रुपये रक्कम समायोजित करण्यायोग्य म्हणून निश्चित करण्यात आली. ह्या समजोत्याची संरचना जेएनपीएचे महसूल संरक्षित करत असताना एनएसआयसीटीला भविष्यातील सवलतीसाठी आवश्यक असलेल्या खंडानुसार अधिक मालवाहतूक वाढवण्याची अट घालत आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांसाठी ही एक फायदेशीर व्यवस्था ठरते.

परिणामी जेएनपीएमधील वाहतूक लक्षणीयरीत्या वाढण्याची अपेक्षा आहे, जे बंदरासाठी जहाजाशी संबंधित शुल्क (व्हीआरसी), बर्थ भाडे आणि रॉयल्टी या माध्यमातून अधिक महसूल निर्माण करेल. हा समन्वय बंदरासाठी मोठा लाभ देणारा असून दीर्घकालीन वादाचा सकारात्मक निकाल आहे, ज्यातून भारतातील पीपीपी मॉडेलच्या यशस्वी अंमलबजावणीविषयी सकारात्मक संदेश देत आहे.

# पनवेलमधील रक्तदान शिबिराला उदंड प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्टच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरामध्ये तब्बल १०१ रक्त पिशव्यांचे संकलन करत रक्तदात्यांची सेंचुरी साजरी करण्यात आली. प्रतिवर्षी चार रक्तदान शिबिराचे आयोजन करणाऱ्या आयोजकांचे हे २६ वे रक्तदान शिबिर होते. आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थिती दर्शवत रक्तदान शिबिराच्या आयोजनाची प्रशंसा केली.

कोरोना कालखंडामध्ये रक्ताची चणचण भासत होती. रक्तदाते मिळवण्यासाठी रुग्णांच्या आप्तेष्टांना हेलपाटे मारावे लागत होते. या गोष्टीची गंभीर्याने दखल घेत अ‍ॅड. मनोहर सचदेव यांच्या पुढाकाराने श्री प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट आणि श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट यांनी रक्तदान शिबिर आयोजित करण्याच्या प्रथेस प्रारंभ केला. त्यानंतर सलग २६ रखदान शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या रक्तदान शिबिराला विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, आम्ही रक्तदाते पनवेलचे, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच आणि नवी मुंबई प्रिंट अँड डिजिटल जर्नालिस्ट असोसिएशन यांचे सहकार्य लाभले.

पनवेलच्या विश्राळी नाका येथील सिंधी पंचायत ट्रस्ट सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे संपूर्ण वातानुकूलित सभागृहात रक्तदान संपन्न झाले.



या वेळी सहभागी होणाऱ्या रक्तदात्यांची इसीजी तसेच रक्त शर्करा तपासणीदेखील करण्यात आली. प्रत्येक रक्तदात्यास प्रेमपूर्वक भेट आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी अ‍ॅड. मनोहर सहदेव, अ‍ॅड. अमोल साखरे, पांडुरंग हुमणे, राजू सचदेव आदींनी अथक परिश्रम घेतले. या शिबिरामध्ये सामाजिक कार्यकर्त्या इंदूमति ठक्कर यांच्या माध्यमातून अवयव दानाचा प्रसार व प्रचार करण्यात येत होता. तसेच इच्छुक अवयव दात्यांचे ऑनलाईन पद्धतीने रजिस्ट्रेशन करण्यात येत होते.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे खजिनदार संजय कदम यांनीसुद्धा या अभिनव उपक्रमास शुभेच्छा दिल्या. त्यांनी तसेच मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक मोरेश्वर पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील आदींनी अ‍ॅड मनोहर सचदेव व त्यांच्या टीमचे भेटवस्तू देऊन कौतुक केले. सुप्रसिद्ध शल्य विशारद डॉ रमेश पटेल यांच्यासह अनेक दिग्गजांनी रक्तदान शिबिरात उपस्थिती दर्शवत आयोजकांची प्रशंसा केली. आयोजकांच्या वतीने दर तीन महिन्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते असे सचदेव यांनी सांगितले तसेच आगामी रक्तदान शिबिर याच ठिकाणी १३ जुलै रोजी होईल, अशी घोषणा केली.

## हत्येच्या गुन्ह्यातील दुसऱ्या आरोपीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील गराडा येथे गोळीबार करून हत्या करून पळून जाणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली होती. या आरोपीला अग्निशस्त्र विकणाऱ्या रविराज जितेकर याला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली.

गराडा गावाजवळ घराचे बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी बाबुराव वाघमारे याच्यावर अग्नीशस्त्राने गोळी मारून प्रभाकर वाघमारे उर्फ चिल्या याने त्याची हत्या केली होती. त्यानंतर आरोपीला खालापूर येथील आदिवासी वाडीतून पनवेल पोलिसांनी अटक केली. आरोपीकडून अग्नीशस्त्रदेखील जप्त करण्यात आले होते. पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपी प्रभाकर वाघमारे याला रविराज जितेकर याने हे अग्निशस्त्र विकत विकले होते आणि त्याच अग्नीशस्त्राने त्याने बाबुराव वाघमारे यांची हत्या केली.

पोलिसांनी आरोपी रविराजला दापोली, पारगाव येथून ताब्यात घेऊन अटक केली. पनवेल शहर पोलिसांनी त्याच्याकडून दोन अग्निशस्त्र जप्त केले आहेत. रविराज याने हे अग्निशस्त्र कुठून आणले आणि यात आणखी कोणी सहभागी आहे का याची चौकशी पोलीस करत आहेत.

# नेरूळ वसाहतीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नेरूळ उपनगरातील सेक्टर ९ मधील एन एल टू टाईपच्या वसाहतीत श्रीराम नवमी सार्वजनिक उत्सव समितीच्या विद्यमाने श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

भजन, राम जन्मोत्सव सोहळा, महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, सत्यनारायणाची महापूजा, लहान मुलांच्या व मुलींच्या विविध स्पर्धा आदि उपक्रम आयोजित करुन श्रीराम जन्मोत्सव आनंदी वातावरणात साजरा झाला. वसाहतीतील नागरिकांनी व मुलांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात भाग घेऊन उत्सव अधिक भारदस्त केला. त्याचप्रमाणे माजी नगरसेविका मीरा पाटील, शिल्पा कांबळी, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, सुरेश शेट्टी तसेच अनेक मान्यवरांनी सहयोग देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

गेली २१ वर्षे सातत्याने साजरा होत असलेल्या या उत्सवात नेरूळ वसाहतीत सेक्टर ९ मध्ये मोठी रथयात्रा काढण्यात आली. रथामध्ये लहान मुलांनी वेशभूषा करुन राम, सीता, लक्ष्मण व हनुमान यांची भूमिका रेखाटली होती. बहुसंख्य महिलांनी डोक्यावर कलश घेऊन या रथयात्रेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला आणि कार्यक्रम अधिक अधोरेखित केला. हजारो नागरिकांनी या यात्रेत सहभाग घेतला व एक आदर्श निर्माण केला. प्रसंगी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.



उत्सव समितीचे अध्यक्ष विजय निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा झाला. अशोक मते, शरद भाट, दर्शन (भाऊ) आंग्रे, भूषण पाटील, मोहन सरगर, सचिन ढवळे, रवी सरगर, अजिंक्य सूर्यवंशी, रोहन गायकवाड, यशवंत गोणेवाड आदी स्वयंसेवकांनी अपूर्व मेहनत घेऊन यशस्वी केला.





**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही शहरामध्ये ठिकठिकाणी आयोजित केलेल्या रामनवमी उत्सवांना भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते.**

# माणगाव टेमपालेत ‘उबाठा’ला धक्का

## कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश; खासदार सुनील तटकरेंकडून स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील टेमपाले येथील कार्यकर्ते व ग्रामस्थांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडचिठ्ठी देत पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य मुक्तार वेळासकर व गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.६) सुतारवाडी येथे खासदार सुनील तटकरे यांच्या बंगल्यावर त्यांच्या उपस्थितीत स्वगृही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.



या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारिणी सदस्य वेळासकर, जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, गोरेगाव सरपंच अब्बासी उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे टेमपाले गावात उबाठा शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.

सुतारवाडी येथे झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमात बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी सुरुवातीला प्रवेशकर्ते सर्व मुस्लिम बांधव-भगिनींना रमजान ईदच्या शुभेच्छा देत त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले. खासदार तटकरे पुढे म्हणाले की, संसदेचे अधिवेशन सुरू असताना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या समवेत माझी मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासंदर्भात चर्चा झाली. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजितदादा पवार नेते असून ते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. आम्ही धर्मनिरपेक्ष विचार घेऊन सर्वधर्मसमभाव मानून आम्ही बहुजन समाजात काम करीत आहोत. अल्पसंख्याक समाजासाठी असणारे मौलाना अबुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळ अधिकतम बळकट करण्याचा प्रयत्न केला. मी आज बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांच्या आशीर्वादाने इथपर्यंत पोहचलो आहे. माझी कन्या राज्याची महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून राज्यातील दोन कोटी ४२ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळवून दिला.

टेमपाले गावातील क्रॉसिंग, रस्ते, पाणी अशी जी काही कामे असतील ती आपण प्राधान्याने करू, असे खासदार तटकरे यांनी प्रवेशकर्त्यांना आश्वासित केले.

प्रदेश पक्षाचे कार्यकारणी सदस्य मुक्तार वेळासकर यांनी, खासदार सुनील तटकरे हे रात्री अपरात्री केव्हाही आपल्या सर्वांच्या कामासाठी तत्पर असतात. त्यांच्यासारख्या नेत्याला ताकद देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याचे सांगून त्यांनी तटकरे यांच्या कार्याचा गौरव केला.

प्रवेशकर्ते जमातुल मुस्लिमीन टेमपाले गावचे अध्यक्ष अजीज गजगे म्हणाले की, यापूर्वीही आम्ही सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातच होतो. टेमपाले गावातील विकासकामे खासदार तटकरे यांच्या माध्यमातून झाली असून यापुढील कामेही तेच करतील असा विश्वास उपस्थित आम्हा सर्व गावकऱ्यांना असून येणाऱ्या सर्वच निवडणुकांत तसेच कायमस्वरूपी तटकरेसाहेबांसोबतच राहू, असा शब्द गजगे यांनी दिला.

या वेळी जमातुल मुस्लिमीन टेमपाले गावचे अध्यक्ष अजीज गजगे, उपाध्यक्ष अजीज अलसुरकर, गणी लोखंडे, सलीम अलसुरकर, सुहेब अलसुरकर, निसार इस्माईल सेन, सज्जाद गजगे, अमान अलसुरकर, निसार सेन, साजिद खानदेशी, मुफ्ती मुजफ्फर सेन, मुक्तार गजगे, जहीर अलसुरकर, साजिद गोडमे, गुलाम अलसुरकर, सौदाबी सेन, नूरजहान सेन, खतिजा दाखवे, नुसरत खानदेशी, रशिदा सेन, तहसीन अलसुरकर यांच्यासह टेमपाले गावातील अनेक कार्यकर्त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या विकास कामांनी भारावून त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

या वेळी खासदार तटकरे यांच्या सूचनेनुसार अल्पसंख्याक सेल जिल्हाध्यक्ष नाझीम हसवारे यांनी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी अब्दुल अजीज गजगे, सचिवपदी अ.गणी दाऊद लोखंडे तर लोणेरे विभाग अध्यक्षपदी मुक्तार गजगे यांची नियुक्ती करून या सर्वांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# खोपोलीत भाजप स्थापना दिन

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेला ४५ वर्ष पूर्ण झाली असून पक्षाचा वर्धापन दिन शहर मध्यवर्ती कार्यालयात उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व शहर मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. ६) उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

६ एप्रिल १९८०साली भारतीय जनता पक्षाची स्थापना करण्यात आली. या वर्षी पक्ष स्थापनेला ४५ वर्ष पूर्ण झाली असून विशेष म्हणजे हा स्थापना दिवस रामनवमीच्या दिवशी आल्याने दुग्धशर्करा योग जुळून आला. हा दिवस देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. खोपोली शहर मध्यवर्ती कार्यालयात प्रभू श्री रामचंद्राच्या प्रतिमेला महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी पाटील व शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांनी पुष्पहार घालून पूजन केले तसेच दिनदयाळ उपाध्याय, शामाप्रसाद मुखर्जी व भारतमाता प्रतिमांना अभिवादन केले.

या वेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अश्विनी पाटील यांनी, हे वर्ष पक्षाचे संघटन पर्व वर्ष असून कार्यकर्त्यांनी सदस्य अभियानात सहभागी होत पक्ष बळकट करण्यासाठी पुढाकार घेतल्याने सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करीत आगामी वर्षात खोपोली नगरपालिका निवडणूक होणार असून भाजपचा नगराध्यक्ष व जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहनही यांनी केले.

रमेश रेटरेकर यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सदस्य अभियानात चांगली कामगिरी केल्याने अभिनंदन करीत आगामी येणारी पालिका निवडणूक आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी तसेच माजी आमदार सुरेश भाऊ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली ताकदीने लढवून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न असल्याचे सुतोवाच केले.

कार्यक्रमाला भाजप शहर सरचिटणीस राहुल जाधव, अजय इंगुळकर, उपाध्यक्ष दिलीप पवार, माजी नगरसेवक सुर्यकांत देशमुख, महिला मोर्चा शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, डॉ. बबन नागरगोजे, संतोष ढोकळे आदींसह बूथ स्तरावरील कार्यकर्ते उपस्थित होते.




# वाकसमधील गृहप्रकल्पात खरेदीदारांची फसवणूक; बिल्डर पोलिसांच्या ताब्यात

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ वाकसजवळील विजय ग्रुप हाऊसिंग सोसायटीत घर खरेदी करू पाहणाऱ्यांचे स्वप्न भंगले असून आर्थिक फसवणूक झाल्याची बाब समोर आली आहे. यामध्ये सुमारे साडेतीनशे जणांची फसवणूक झालेली असून आकडा वाढण्याची शक्यता आहे. ७५ कोटींच्या आसपास ही फसवणूक असल्याचे खरेदीदारांचे म्हणणे आहे. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी बिल्डर अतीव गाला याला भांडुपमधून ताब्यात घेतले आहे.

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभे राहत आहेत, पण काही गृहप्रकल्पात अनेकांची फसवणूक झाल्याचे चित्र समोर आहे. अशातच विजय हाऊसिंग सोसायटी या नामांकित बिल्डरकडून ग्राहकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. नेरळजवळील वाकस ग्रामपंचायत हद्दीत विजय हाउसिंग सोसायटीचा १०६ एकरमध्ये गृह प्रकल्प उभारला गेला असून ८० टक्के काम पूर्णत्वास गेलेले आहे, मात्र घर खरेदी करू पाहणाऱ्या खरेदीदारांना त्यांचे हक्काचे घर मिळाले नाही. संसारात पदर मोड करून जमवलेले पैसे हे २०१४मध्ये घर खरेदीसाठी येथील खर्च केले असल्याचे सांगण्यात आले आहे. यासाठी ग्राहकांनी बँकेच्या माध्यमातून लोनदेखील घेतले. २०१८मध्ये घराचा ताबा मिळणार होता, ते घर अद्यापही मिळालेले नाही, असे एक खरेदीदार भीमराव वाघमारे यांनी सांगितले.

या गृहप्रकल्पात सुरुवातीला ६०० खरेदीदारांनी अर्ज केले होते. यामध्ये साडेतीनशे लोकांचे अर्ज भरून पैसेदेखील देण्यात आले. कुणी १५ लाख भरले, तर कोणी आठ लाख दिले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर खरेदीदारांनी २०२१मध्ये बिल्डरविरोधात नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर रेरामध्येही तक्रार केल्यावर आमच्या बाजूने निकाल देण्यात आल्याचे खरेदीदार सांगत आहेत. आमच्यातील काही खरेदीदार हयात नाहीत. यामध्ये प्रथम तक्रार देणारे डॉ. गजानन कागलकर यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी आस लावून आहे. कोणाचे वय झाले आहे, तर कोण रिक्षा चालवून कुटुंब पोसत आहेत.

बिल्डर वज्रिलाल गाला यांचा २०२०मध्ये मृत्यू झाल्याने त्यांचा मुलगा अतीव गाला सर्व पाहत होता, परंतु तो खरेदीदारांच्या तक्रारीच्या भीतीने लपून होता. अखेर नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या टीमने आरोपी बिल्डरला भांडुप परिसरातून पकडले. त्यामुळे गृह खरेदीदारांनी नेरळ पोलीस ठाण्यात भेट घेत आरोपी बिल्डरला शिक्षा झाली पाहिजे आणि आमचे घर मिळेल म्हणून विनंती केली तसेच पोलिसांनी बिल्डरला पकडल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.

## आकांक्षा कारंडेचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुयश

**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स टाऊनशीप नागोठणे येथे राहणाऱ्या आकांक्षा अरुण कारंडे हिने नुकत्याच सिंगापूर येथे झालेल्या कॉर्ननेट ग्लोबल अकॅडेमिक चॅलेंज-१७ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुयश मिळविले. तिच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. एआय प्रणालीचा कॉर्पोरेट रिअल इस्टेटवरील परिणाम हा या स्पर्धेचा मुख्य विषय होता.

विशेष म्हणजे या स्पर्धेत आशिया खंडातील सर्व देशांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. मुख्य कार्यक्रम सिंगापूर येथे तीन दिवस पार पडला, ज्यात स्पर्धेचे विजेते म्हणून आकांक्षा कारंडे हिच्या संघाला प्रथम क्रमांकाने घोषित करण्यात आले. आकांक्षाने सर जे.जे. आर्किटेक्चर महाविद्यालय मुंबई येथून पदवी प्राप्त केली असून सध्या ती निकमार युनिव्हर्सिटी पुणे येथे कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट यात एमबीए शिकत आहे.

## नेरळ रेल्वेस्थानकातील स्कायवॉकच्या पहिल्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर



**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकात प्रवाशांसाठी स्कायवॉक उभारला जात आहे. फलाट १च्या पादचारी पूल येथून जाणारे प्रवासी आता थेट मध्य रेल्वे पार्किंगमध्ये जाणार आहेत. या स्कायवॉकच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात असून या महिन्यात स्कायवॉक प्रवाशांसाठी खुला होणार आहे.

मध्य रेल्वेवरील मुंबई- पुणे मेन लाईनवरील नेरळ जंक्शन रेल्वेस्थानकावर प्रवाशांच्यासाठी स्कायवॉक उभारला जात आहे. या स्थानकात लोकलने मुंबई येथून येणारे प्रवासी हे थेट स्थानकाच्या बाहेर पडू शकणार आहेत. नेरळ स्थानकाचा मेकओव्हर सुरु असून त्यात फलाट १वर स्काय वॉक उभारला जात आहे.

या स्कायवॉकच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होत आले आहे. यामुळे स्कायवॉकवरील कर्जत दिशेकडील पादचारी पूल येथून प्रवासी थेट नेरळ बाजारपेठेत असलेल्या रेल्वे पार्किंगमध्ये पोहचणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना नवीन स्कायवॉकने फायदा होणार आहे.

या स्कायवॉक वर सध्या छप्पर टाकण्याचे काम सुरु आहे तसेच आजूबाजूला काचा लावण्याचे काम आणि किरकोळ कामे सुरू आहेत. मध्य रेल्वे महाव्यवस्थापक या महिन्यात नेरळ स्थानकाची पाहणी करण्यासाठी येण्याची शक्यता आहे. त्या वेळी नेरळ स्थानकातील एक पादचारी पूल आणि तेथील स्कायवॉकचा पहिला टप्पा प्रवासीवर्गासाठी खुला केला जाण्याची शक्यता आहे. या स्कायवॉकमुळे नेरळ स्थानकाचे रूप पालटणार आहे.

# रायगड जिल्ह्यात राम नवमी विविध कार्यक्रमांनी साजरी

## श्रीवर्धनमध्ये चतुर्थ तपपूर्ती सोहळा



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीराम जन्मानिमित्त ४८व्या चतुर्थ तपपूर्ती सोहळयाचे आयोजन श्रीवर्धनजवळील जीवना बंदर येथील श्री राम मंदिरात अत्यंत श्रद्धेने व भक्तिभावाने करण्यात आले होते. या सोहळ्याच्या एक भाग म्हणून अखंड हरिनाम सप्ताह झाला.


या वेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले महंत पुरूषोत्तममहाराज पाटील आळंदीकर यांनी सोहळ्याच्या वेळी उपस्थित भक्तगणांना एक महत्त्वपूर्ण उपदेश दिला. त्यांनी सांगितले, परमार्थ म्हणजे प्राप्त परिस्थितीत तृप्त राहणे हे होय. त्यांच्या या गोड व गहन विचारांनी सर्व उपस्थित भक्तांमध्ये एक आध्यात्मिक जागृती निर्माण केली.

महाराजांनी जीवनातील विविध मुद्द्यांवर सखोल विचार मांडले. नामस्मरणामध्ये जीवनाचा खरा परिपूर्ण आनंद आहे, असे सांगत जीवनातील अनुभवांवर प्रकाश टाकला. या सोहळ्याला असंख्य भक्तगण उपस्थित होते. त्यांनी श्री रामचंद्रांचे दर्शन घेतले.

## कर्जत तालुक्यामध्ये भाविकांनी घेतला उत्सवात सहभाग

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील श्री राम मंदिरांमध्ये राम नवमीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवात असंख्य भाविकांनी सहभागी होत प्रभू रामाचे दर्शन घेतले.



दहिवली येथील श्री विठ्ठल संस्थानच्या श्री राम मंदिरातही भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्रीराम पंचायतन पंचक्रोशी दैवज्ञ समाज ट्रस्टच्या मंदिरात ब्रह्मचैतन्य उपासना केंद्राच्या सदस्यांनी काकड आरती केली त्यानंतर महापूजा, अभिषेक, रामजन्माचा सोहळा, रामरक्षा, रामपाठ झाल्यानंतर श्री रामाच्या मूर्तीचे दर्शन प्रत्येक भाविकाला जागेवर नेऊन देण्यात आले. कोकण आळीतील विजय जिनगरे यांच्या निवासस्थानी व साळोख येथील कृष्णा कदम यांच्या निवासस्थानीसुद्धा रामनवमी उत्सव झाला. कडाव येथील श्री बाल दिगंबर गणेश संस्थानच्या श्री राम मंदिरात उत्सव साजरा करण्यात आला.

नेरळ जुन्या बाजारपेठेतील श्रीराम मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री रामाचा जन्मोत्सव साजरा करताना जन्मकथेवर कीर्तन झाले.

दहिवली येथे महाप्रसादानंतर श्री रामाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. बेंडसे, कडाव, साळोख, वेणगाव, नेवळी, माथेरान येथेही राम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री राधाकृष्ण व मारुती मंदिर सेवा संस्थानच्या वतीने राम नवमीनिमित्त कर्जत शहरातून शोभायात्रा काढण्यात आली होती. या वेळी भाजप नेते किरण ठाकरे, शिवलाल गुप्ता, शिवसेवक गुप्ता, उमाशंकर गुप्ता, सूर्यकांत गुप्ता, शिवकिशोर गुप्ता, प्रमोद गुप्ता, किशोर ठाकरे, जयेश ठाकरे, संतोष वैद्य, महेंद्र कर्वे, अमित गुप्ता, नितीन गुप्ता आदींसह कर्जतकर उपस्थित होते.

## माणगावमध्ये भाविकांना लाडू आणि पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे राम नवमी अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी झाली. प्रभू श्रीरामांच्या पालखी मिरवणुकीसाठी हजारो भक्तगणांनी उपस्थिती लावली होती. या वेळी माणगाव चारिझेन फाउंडेशन आणि माणगाव सिख सेवा सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने २,४०० लाडू आणि पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप भाविकांना करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर, युवा नेते सुमित काळे, चारिझन फाउंडेशन उपाध्यक्ष सतीश काळे, सचिन वाघ, विलास आठवले, अनिल कराड, विजयश्री कराड, किशोर झेमसे, कमलेश विश्वकर्मा अणि पूर्ण टीम उपस्थित होती. माणगाव सिख सेवा सोसाइटी अणि चारिझन फाउंडेशनच्या या निःस्वार्थ उपक्रमाबद्दल फाउंडेशनचे अध्यक्ष कॅ. निर्मलसिंग रंधावा आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानण्यात आले.

माणगाव सिख सेवा सोसायटीचे सुरिन्दरसिंह बर्मन, गुरविंदरसिंह सोढी, गुरविंदरसिंह भाटिया, विरेंद्रसिंह बर्मन, अशोक सिंह व संपूर्ण टीममुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला असे चारीझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅ. निर्मलसिंग रंधावा यांनी सांगितले. या सेवाभावी उपक्रमामुळे भक्तांना प्रसादाचा आनंद घेता आला आणि उन्हाच्या तापमानातही थोडा दिलासा मिळाला.



## मुरूड एकदरा येथे राम जन्मोत्सव उत्साहात



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील एकदरा गावात १९६३पासून धनुर्धारी मंडळातर्फे राम नवमीची परंपरा अखंडपणे सुरू आहे. यंदीही श्रीराम जन्मोत्सव सोहळा कोळी समाजातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला.

पारंपारिक पद्धतीने मासेमारी करून उदरनिर्वाह करणारा कोळी समाज एकदरा येथे राहतो. १९४४मध्ये ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यातून विस्थापित झालेल्या रामा कोळी यांचे हे वशंज आहेत.

राम नवमीनिमित्त राम मंदिराच्या प्रांगणात असंख्य महिला, पुरुषांच्या उपस्थितीत कीर्तनकार केदार आठवले (चौल) यांचे कीर्तन झाले. त्यांना तबल्याची साथ देविदास दातार (दापोली) व संवादिनी साथ गजानन दाते (थळ) यांनी दिली.

दरम्यान, मंदिर परिसरात विद्युत रोषणाईसह आकर्षक रांगोळ्या तसेच भगव्या पताकांनी संपूर्ण गाव लखलखत होते. जन्मोत्सव सोहळा व दर्शनासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी गर्दी केली होती.

# गुजरातची हैदराबादवर मात



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

दमदार सांघिक प्रदर्शनाच्या बळावर गुजरात टायटन्स संघाने सनरायझर्स हैदराबाद संघावर सात विकेट्सनी विजय मिळवला. हैदराबादचा यंदाच्या हंगामातला हा चौथा सलग पराभव आहे.

गुजरातने खेळपट्टीचा नूर ओळखून गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात मोहम्मद सिराजने ट्रॅव्हिस हेडला बाद केले. त्याने आठ धावा केल्या. फटकेबाजीला सुरुवात केलेल्या अभिषेक शर्माला सिराजनेच तंबूचा रस्ता दाखवला. त्याने १८ धावा केल्या. पाठोपाठ इशान किशनही बाद झाला. प्रसिध कृष्णाने त्याला स्थिरावू दिले नाही. ५०/३वरून हेनरिच क्लासन आणि नितीश रेड्डी यांनी ५० धावांची भागीदारी केली. साई किशोरने क्लासनला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. त्याने २७ धावा केल्या. पुढच्याच षटकात नितीश रेड्डीला माघारी धाडत हैदराबादला अडचणीत आणले. त्याने ३१ धावा केल्या.

उर्वरित षटकांमध्ये अनिकेत वर्मा (१४ चेंडूत १८) आणि कर्णधार पॅट कमिन्स (नाबाद २२) यांनी उपयुक्त खेळी करत हैदराबादला सन्मानजक धावसंख्या गाठून दिली. सिराजने १७ धावांत चार विकेट्स घेतल्या. प्रसिध कृष्णा आणि साईकिशोर यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शन मोहम्मद शमीची शिकार ठरला. पॅट कमिन्सने जोस बटलरला बाद केले. यामुळे गुजरातची अवस्था १६/२ अशी झाली. यानंतर शुबमन गिल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ९० धावांची भागीदारी केली. या भागीदारीने गुजरातच्या विजयाचा पाया रचला. गुजरातसाठी पदार्पणात वॉशिंग्टनने ४९ धावांची सुरेख खेळी साकारली. शमीच्या गोलंदाजीवर अनिकेत वर्माने सुरेख झेल टिपत त्याची खेळी संपुष्टात आणली.

कर्णधार शुबमनने सूत्रधाराची भूमिका निभावत संयमी अर्धशतकी खेळी साकारली. वॉशिंग्टन बाद झाल्यानंतर शेरफन रुदरफोर्डने वेगवान पवित्रा स्वीकारला. त्याने अभिषेक शर्माच्या एका षटकात १८ धावा वसूल केल्या. गिलने ४३ चेंडूत ६१ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १६ चेंडूत ३५ धावा केल्या.

## ‘एमसीए’कडून रायगड क्रिकेटच्या विकासासाठी पाच लाखांचा निधी

**अलिबाग, खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात क्रिकेटच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)कडून पाच लाख रुपयांचा विकास निधी सुपूर्द करण्यात आला असल्याची माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

गेल्या सहा महिन्यांत आरडीसीएच्या वतीने विविध वयोगटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. निवड चाचणी प्रक्रिया ही स्पर्धेच्या माध्यमातून केली गेल्याने जिल्ह्यातील सर्व वयोगटातील खेळाडूंना आपल्यातील खेळाच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली असून स्पर्धेतील केलेल्या कामगिरीच्या आधारावर खेळाडूंची निवड जिल्ह्याच्या संघात करण्यात आली आहे. त्याचबरोबर एमसीएच्या वतीने घेण्यात आलेल्या पंच व गुणलेखकांच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केल्याचे दिसून आले आहे.

आरडीसीएने सर्व स्पर्धा व क्रिकेटच्या विकासाच्या संबंधीचा अहवाल तयार करून एमसीएकडे पाठवला होता. त्याची दखल घेऊन एमसीएने रायगडात क्रिकेटच्या सर्वांगीण विकासासाठी पाच लाख रुपये विकास निधी मंजूर करून आरडीसीएला सुपूर्द करण्यात आला.

येणाऱ्या काळात एमसीए रायगड जिल्ह्यात क्रिकेटच्या मैदानांसाठीसुद्धा विशेष लक्ष देऊन आर्थिक निधीची तरतूद पूर्ण करणार असल्याची माहिती आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी दिली.

एप्रिल महिन्यात जिल्ह्यातील मुला-मुलींसाठी आरडीसीए प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात येणार असून स्पर्धेसाठी एमसीएचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

रायगड जिल्हाला क्रिकेटच्या विकासासाठी आर्थिक निधी दिल्याबद्दल एमसीए अध्यक्ष आमदार पवार व सचिव ॲड. कमलेश पिसाळ यांचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी आभार मानले आहेत.

## झोपेतून उठलेल्या जोफ्राची भेदक गोलंदाजी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सचा गोलंदाज जोफ्रा आर्चरने आपल्या वेगाच्या जोरावर वादळी कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यंदाच्या आयपीएलमधील पहिल्याच सामन्यात ७५ धावा दिल्यानंतर आर्चरने पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात दणक्यात पुनरागमन करत राजस्थानच्या विजयाचा हिरो ठरला. अगदी झोपेतून उठून आर्चरने पहिल्याच षटकात दोन मोठ्या विकेट्स घेत सामना राजस्थानच्या बाजूने वळवला.

पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यादरम्यान जेव्हा राजस्थान संघाची फलंदाजी सुरू होती. तेव्हा आर्चर मात्र ड्रेसिंग रूममध्ये चादर घेऊन साखर झोपेत होता. सामन्यादरम्यान झोपलेला आर्चर कॅमेऱ्यात कैद झाला आणि काही वेळातच तो सोशल मीडियावर व्हायरल झाला.

झोपून उठल्यानंतर आर्चरने पहिल्याच षटकात आपली छाप पाडली. या सुपरफास्ट वेगवान गोलंदाजाने पहिल्याच चेंडूवर पंजाबचा सलामीवीर प्रियांश आर्यचा त्रिफळा उडवला. जोफ्रा इथेच थांबला नाही आणि पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरला त्याच षटकात त्याने माघारी धाडले. आर्चरच्या या कामगिरीने पंजाबला बॅकफूटवर ढकलले.

**युवा खेळाडूलाही लागली झोप**

सामना सुरू असताना झोपणारा आर्चर हा पहिला खेळाडू नव्हता. शनिवारी झालेल्या डबल हेडरमधील पहिल्या सामन्यात हेच चित्र दिसले. पंजाब आणि राजस्थान यांच्यातील या सामन्यापूर्वी चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना झाला. या सामन्यात चेन्नईच्या फलंदाजीदरम्यान संघाचा युवा खेळाडू वंश बेदी डगआउटमध्ये झोपलेला दिसला. या सामन्यासाठी वंश प्लेइंग इलेव्हनचा भाग नसला तरी त्याचा फोटो चांगलाच व्हायरल झाला.

## पाकिस्तानचा क्रिकेटपटू खुशदिल शहाची प्रेक्षकांशी बाचाबाची

**माउंट मानुगाउई : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा क्रिकेटपटू खुशदिल शहा आणि प्रेक्षकादरम्यान हाणामारी पहायला मिळाली. पाकिस्तानचा संघ न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आहे. शनिवारी सकाळी माऊंट मांघनाई इथे तिसरा वनडे सामना झाला. पाकिस्तानचा या लढतीत ४३ धावांनी पराभव झाला. ट्वेन्टी-२० मालिकेपाठोपाठ वनडे मालिकेतही पाकिस्तानचा दारुण पराभव झाला, मात्र सामन्यातल्या घडामोडींपेक्षा या घटनेचीच चर्चा जास्त रंगली.

बे ओव्हल इथे झालेल्या लढतीला काही अफगाणिस्तान प्रेक्षक उपस्थित होते. खुशदिल सीमारेषेनजीक क्षेत्ररक्षण करत होता. सामना संपल्यानंतर हे प्रेक्षक आणि खुशदिल यांच्यात बाचाबाची झाली. चाहत्यांच्या शेरेबाजीने भडकलेला खुशदिल त्या प्रेक्षकांच्या दिशेने धावून गेला. मैदानातील सुरक्षारक्षकांनी तसेच पाकिस्तानच्या खेळाडूंनी वेळीच मध्यस्थी करून खुशदिलला बाजूला केले.

## तंदुरूस्तीचा विचार करून आयपीएल निवृत्तीचा विचार करेन

**चेन्नई : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएलमध्ये दिग्गज क्रिकेटर महेंद्रसिंह धोनी याचा फॉर्म चिंतेचा विषय बनला आहे. त्याने चार सामन्यांत केवळ ७६ धावा केल्या. चौकार-षटकार मारणे त्याला कठीण जात आहे. यामुळे त्याच्या निवृत्तीची पुन्हा चर्चा सुरू झाली. यावर चेन्नई संघाचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी धोनी खेळण्यासाठी फिट असल्याचे म्हटले आहे तसेच निवृत्तीसंदर्भात धोनीशी आपली काहीही चर्चा झालेली नसल्याचेही स्पष्ट केले आहे.

**धोनीने सोडले मौन**



४३ वर्षीय धोनीने २०२०मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली, पण तो अद्यापही आयपीएलमध्ये सक्रिय आहे. शनिवारी चेपॉकवर धोनीचे आई-वडील पहिल्यांदाच सामना पाहण्यासाठी हजर होते. त्यामुळे त्याच्या आयपीएलमधील निवृत्तीबद्दलही चर्चांना उधाण आले होते. तथापि, आता धोनीने स्वतः च्या निवृत्तीबद्दल केलेले भाष्य बोलके ठरले आहे.

राज शमानीच्या नव्या पॉडकास्टमध्ये धोनीने अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. तो म्हणाला की, आयपीएल २०२५नंतर लगेचच निवृत्ती घेण्याचा विचार करीत नाही. तंदुरूस्तीचा विचार करून पुढचा हंगाम खेळायचा की नाही हे ठरवेन.

धोनी पुढे म्हणाला, नाही, सध्या तरी नाही. मी अजूनही आयपीएल खेळत आहे. मी या गोष्टी खूप सोप्या ठेवल्या आहेत. मी एकावेळी एकाच वर्षाचा विचार करतो. मी ४३ वर्षांचा आहे आणि जेव्हा आयपीएल २०२५ स्पर्धा संपेल, त्यानंतर मी काही महिन्यात ४४ वर्षांचा होणार आहे. त्यानंतर माझ्याकडे खेळायचे की नाही याचा निर्णय घेण्यासाठी १० महिने असतील. हा निर्णय मी नाही, तर माझे शरीरच घेईल. त्यामुळे सध्यातरी एकाच वर्षाचा विचार करीत आहे, त्यानंतर पुढचा विचार करेन.

## चार संघांनी दुर्लक्ष केलेला रूदरफोर्ड ठरतोय गेमचेंजर

**मुंबई : प्रतिनिधी**



वेस्ट इंडिजचा तडाखेबंद फलंदाज शेरफन रूदरफोर्ड याने यंदाच्या आयपीएल हंगामात रुदरफोर्डने आपली ताकद दाखवून दिली आहे. रविवारी झालेल्या लढतीत रुदरफोर्डने १६ चेंडूत ३५ धावांची वेगवान खेळी करत गुजरातचा विजय सोपा करून टाकला. रुदरफोर्डने त्याचा इम्पॅक्ट प्रत्येक लढतीत दाखवला आहे. रुदरफोर्ड आयपीएल स्पर्धेत चार संघांकडून खेळला, पण त्याच्या गुणवत्तेला खरा न्याय गुजरात टायटन्स संघाने दिला आहे.

रुदरफोर्डने पंजाबविरूद्ध अहमदाबाद इथे झालेल्या लढतीत ४६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर मुंबईविरुद्ध १८ धावा केल्या. बंगळुरूविरुद्ध रुदरफोर्डने नाबाद ३० धावांची खेळी केली. हाच फॉर्म कायम राखत रुदरफोर्डने हैदराबादविरुद्धही शानदार खेळी साकारली.

आयपीएलच्या २०१९ हंगामात रुदरफोर्डने पदार्पण केले. त्या वर्षी तो दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळला. त्याला सात सामन्यात संधी मिळाली. दिल्लीने पुढच्याच वर्षी त्याला रिलीज केले. २०२०मध्ये तो मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. जेतेपद पटकावणाऱ्या विजयी संघाचा तो भाग होता, मात्र त्याला एकाही सामन्यात संधी मिळाली नाही. २०२२मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने संघात समाविष्ट केले, पण त्याला केवळ तीन सामन्यात खेळवण्यात आले. २०२४मध्ये जेतेपद पटकावणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्स संघाचा तो हिस्सा होत, पण अख्ख्या हंगामात त्याला एकाही सामन्यात संधी मिळाली नाही.

या हंगामाच्या आधी झालेल्या लिलावात गुजरात टायटन्स संघाने २.६ कोटी रुपये खर्चून त्याला ताफ्यात समाविष्ट केले. गुजरातच्या संघात न्यूझीलंडचा ग्लेन फिलीप्सही आहे. अफलातून क्षेत्ररक्षण करणाऱ्या आणि उत्तम फॉर्मात असणाऱ्या फिलीप्सला संघात घ्यावे अशी चर्चा सोशल मीडियावर रंगते, पण गुजरात संघव्यवस्थापनाने रुदरफोर्डवर विश्वास ठेवला आहे आणि त्यानेही हा विश्वास सार्थ ठरवला आहे.

**झटपट प्रकारात पुरेसा अनुभव**

आयपीएलव्यतिरिक्त रुदरफोर्ड कॅरेबियन प्रीमिअर लीग, बांगलादेश प्रीमिअर लीग, पाकिस्तान सुपर लीग, यांच्यासह लंका प्रीमिअर लीग, मेजर लीग क्रिकेट, आयएलटी २० अशा असंख्य टी-२० स्पर्धांमध्ये खेळतो. त्यामुळे या प्रकारात खेळण्याचा पुरेसा अनुभव रुदरफोर्डकडे आहे. प्रचंड ताकदीने फटकेबाजी हे रूदरफोर्डचे वैशिष्ट्य आहे. फटकेबाजीच्या बरोबरीने त्याच्या खेळात नजाकतही आहे. याशिवाय तो उपयुक्त मध्यमगती गोलंदाजही आहे.

## ‘वेलकम मुफासा’! बुमराह संघात परतताच पोलार्डने घेतले उचलून

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई इंडियन्सचे प्रमुख अस्त्र असलेला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह संघात परतला. यानिमित्ताने संघव्यवस्थापनाने त्याचे दणक्यात स्वागत केले.


मुंबई इंडियन्सने शेअर केलेल्या व्हिडीओत संपूर्ण संघाने बुमराहचे भरभरून स्वागत केले. या वेळी संघाचा फलंदाजी प्रशिक्षक कायरेन पोलार्डने बुमराहचे स्वागत करीत चक्क त्याला उचलून घेतले. ‘वेलकम मुफासा’ अशा शब्दांत पोलार्डने बुमराहचे स्वागत केले. ‘द लायन किंग’ या ॲनिमेशन चित्रपटात मुफासा हा सिंह जंगलाचा प्रमुख असतो. त्या धर्तीवर बुमराह हा मुंबई इंडियन्स संघाचा आधारवड आहे. त्यामुळे पोलार्डने बुमराहचा उल्लेख मुफासा असा केला. यानंतर मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंनी टाळ्यांचा कडकडाट केला.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यात बुमराहच्या भेदक गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाने गुडघे टेकले. बुमराहविरुद्ध ऑस्ट्रेलियाचा संघ असे काहीसे समीकरण झाले होते, पण सलग गोलंदाजीचा परिणाम पहायला मिळाला. बुमराहचे पाठीचे दुखणे बळावले. दुखापतीचे स्वरूप गंभीर असल्यामुळे तो इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत तसेच चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतही खेळू शकला नाही. आयपीएल स्पर्धेतही तो नेमका कधी खेळू शकेल याविषयी साशंकता होती. बंगळुरूतल्या एनसीएमध्ये प्रदीर्घ रिहॅब प्रक्रिया पूर्ण करून बुमराह मुंबईत परतला आहे.

बुमराहच्या अनुपस्थितीत मुंबईने चार सामने खेळले असून त्यापैकी तीन गमावले आहेत. ट्रेंट बोल्ट, दीपक चहर यांना लय गवसलेली नाही. अश्वनी कुमार आणि विघ्नेश पुथ्थूर या युवा शिलेदारांनी चमकदार पदार्पण केले आहे, पण मुंबईला बुमराहची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली आहे.

## इशांत शर्माला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



धडाकेबाज फलंदाजांचा संघ अशी ओळख असलेल्या सनरायझर्स हैदराबादला रविवारी गुजरात टायटन्सने पराभवाचे पाणी पाजले. गुजरात संघाकडून इशांत शर्मा इमॅक्ट गोलंदाज म्हणून आला होता, मात्र तो सर्वात महागडा गोलंदाज ठरला. त्याने ४ षटकांत ५३ धावा दिल्या आणि त्याला एकही विकेट मिळाली नाही. त्यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणून इशांतला मैदानावरील एका घटनेसाठी बीसीसीआयकडून शिक्षाही झाली.

सामन्यादरम्यान इशांत शर्माला नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले. तथापि, आयपीएलने जारी केलेल्या प्रेस रिलीजमध्ये या घटनेचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यात फक्त एवढेच म्हटले होते की, इशांतने त्याचा गुन्हा कबूल केला आहे. त्याला लेव्हल १चा दोषी आढळला आहे. इशांतने त्याची चूक मान्य केल्यामुळे यावर पुढील सुनावणी होणार नाही. आयपीएल नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल त्याला दोषी ठरवले गेले आणि सामन्याच्या मानधनातील २५ टक्के रक्कम त्याला दंड म्हणून ठोठवण्यात आली.

इशांत शर्मा हा २००८पासून आयपीएलमध्ये खेळतो आहे. गुजरात टायटन्स हा त्याचा सातवा संघ आहे. त्याने आयपीएल २०२५मध्ये गुजरात टायटन्सकडून आतापर्यंत तीन सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने फक्त एक विकेट घेतली आहे. एकूण आयपीएलमध्येही त्याने आतापर्यंत ११३ सामने खेळले आहेत आणि ९३ विकेट्स घेतल्या आहेत. आगामी काळात इशांत शर्माला कामगिरी सुधारावी लागेल.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com